cmyk

## संपादकीय

### संस्थांवर हल्ला ; आणीबाणीपेक्षाही मोठा धोका?

२५ जून १९७५. भारतीय लोकशाहीचा काळा दिवस. आणीबाणी लागू झाली. हजारो विरोधी नेते तुरुंगात गेले. वर्तमानपत्रांवर सेन्सॉरशिप लादली गेली. न्यायव्यवस्था, प्रसारमाध्यमे आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार अभूतपूर्व दबावाखाली आले. तो काळ भयानक होता, पण निदान एक गोष्ट स्पष्ट होतीदेशाला माहिती होते की लोकशाहीवर हल्ला झाला आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–११५ | बुधवार दि.१५ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### एसटी महामंडळाचे राज्यव्यापी वृक्षारोपण

मुंबईः महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त विद्या विहार येथील विभागीय कार्यालयातून राज्यव्यापी वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आमदार दिलीप लांडे, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्यासह महामंडळाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. या अभियानाच्या माध्यमातून राज्यभरातील एसटीची बसस्थानके, आगारे, कार्यालये आणि विविध परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, आजचा कार्यक्रम हा केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित नसून भावी पिढ्यांसाठी हिरवा, समृद्ध आणि सुरक्षित महाराष्ट्र घडविण्याचा सामूहिक संकल्प आहे.

### भाषेत अनुत्तीर्ण झाल्यास प्रमाणपत्र नाकारणार

नवी दिल्ली : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने त्रिभाषा सूत्रावरून निर्माण झालेल्या गदारोळानंतर नियमांमध्ये महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. आगामी वर्षांत इयत्ता १० वीच्या बोर्ड परीक्षेत विद्यार्थ्यांना तिसऱ्या भाषेचा पेपर द्यावा लागणार नाही, असे बोर्डाने यापूर्वीच स्पष्ट केले होते. मात्र, आता या धोरणाबाबत निर्माण झालेल्या विविध शंकांचे निरसन करताना बोर्डाने एक महत्त्वाची नियमावली जारी केली आहे. जर एखादा विद्यार्थी ९ वीमध्ये तिसऱ्या भाषेत अनुत्तीर्ण झाला, तर त्याला १० वीत प्रवेश कसा मिळणार आणि या विषयात उत्तीर्ण होणे कितपत अनिवार्य आहे, याविषयी बोर्डाने सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे.

### वांगचुक यांच्या उपोषणाचा १७ वा दिवस

दिल्लीः शिक्षणतज्ज्ञ आणि पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक गेल्या १७ दिवसांपासून दिल्लीतील जंतर-मंतर येथे आमरण उपोषण करत आहेत. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत असून, याबाबत आंदोलनकर्त्यांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. प्रसिद्ध करण्यात आलेल्या वैद्यकीय अहवालानुसार, उपोषण सुरू झाल्यापासून सोनम वांगचुक यांचे सुमारे ८.२५ किलो वजन घटले आहे. तसेच त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी अनेक वेळा ७० / पेक्षाही खाली गेल्याचे सांगण्यात आले आहे. याशिवाय त्यांना सतत चक्कर येणे, स्नायूंची झपाट्याने झीज होणे आणि शरीरात अशक्तपणा जाणवत असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. प्रकृती खालावली असली तरी वांगचुक यांनी आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचे स्पष्ट केले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ६३.०० क्विंटल** | | |
| २,५५६ | २,७८१ | २,६५१ |
| **ज्वारी/हायब्रिड : ७२.०० क्विंटल** | | |
| २,३५१ | ४,२४० | २,९५३ |
| **मका/लोकल: ३९.५० क्विंटल** | | |
| २,००० | २,२४९ | २,१२४ |
| **तूर : ४.५० क्विंटल** | | |
| ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| **उडीद : २.०० क्विंटल** | | |
| ५,००० | ५,००० | ५,००० |
| **बाजरी: १५७.५० क्विंटल** | | |
| २,५०० | ३,१६० | २,८७४ |
| **मुग: १.०० क्विंटल** | | |
| ७,०६० | ७,०६० | ७,०६० |
| **सोयाबीन:१.५० क्विंटल** | | |
| ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| **हरभरा: १७.०० क्विंटल** | | |
| ४,५०१ | ५,७०० | ५,३६८ |

# निकषात सुधारणा; ३६ लाख शेतकऱ्यांना थेट लाभ

## शेतकऱ्यांसाठी सरकारचा मोठा निर्णय; कर्जमाफीचा लाभ अधिक व्यापक

मुंबई | प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय घेत राज्य मंत्रिमंडळाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६च्या निकषांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यास मंगळवारी मंजुरी दिली. या निर्णयामुळे २०१९ मधील महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या सुमारे १३ लाख शेतकऱ्यांवरील ५० हजार रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीची मर्यादा पूर्णपणे हटविण्यात आली असून, आता हे शेतकरीही इतर पात्र शेतकऱ्यांप्रमाणे २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीस पात्र ठरणार आहेत.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. विधानसभेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी याबाबत केलेल्या घोषणेची आज अधिकृत अंमलबजावणी करण्यात आली. यासोबतच शेतकऱ्यांसाठी आणखी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. यापूर्वी प्रोत्साहनपर लाभ मिळण्यासाठी सन २०२६-२७ मध्ये नवीन पीक कर्ज घेऊन त्याची नियमित परतफेड करणे बंधनकारक करण्यात आले होते. मात्र, ही अट आता पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे केवळ या अटीमुळे लाभापासून वंचित राहण्याची शक्यता असलेल्या सुमारे २३ लाख नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारच्या मते, या सुधारणांमुळे अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर ▶▶ पान २ वर

## तुकाराम मुंढेंचा धडाका ; मुंबईतील तीन सुप्रसिद्ध हॉटेल्सचा जागेवरच परवाना रद्द



मुंबई | प्रतिनिधी

आपल्या कडक आणि शिस्तप्रिय कार्यपद्धतीसाठी ओळखले जाणारे अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईत मोठी कारवाई करण्यात आली आहे. मुंबईतील अत्यंत लोकप्रिय आणि नामांकित अशा तीन हॉटेल्सचे अन्न परवाने निलंबित करण्यात आले आहेत. भेंडीबाजार आणि उमरखाडी परिसरातील या हॉटेल्सवर ही कारवाई करण्यात आली असून, यामुळे हॉटेल व्यावसायिक आणि खाद्यप्रेमींमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

एफडीएने केलेल्या या धडक कारवाईत मुंबईतील शालिमार हॉस्पिटॅलिटी, नूर मोहम्मदी हॉटेल, रहमानिया रेस्टॉरंट यांचा समावेश आहे. एफडीएच्या अधिकाऱ्यांनी या हॉटेल्सची ▶▶ पान २ वर

## मंत्रिमंडळाचा विस्तार : राष्ट्रवादीत बदलाचे वारे

### आ.धनंजय मुंडे आणि मावळचे आ.सुनील शेळके यांच्या नावांची जोरदार चर्चा

मुंबई | प्रतिनिधी

**राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार लवकरच होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, त्याआधी महायुतीत मोठ्या राजकीय हालचाली सुरू झाल्याची चर्चा आहे. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसकडून काही विद्यमान मंत्र्यांना वगळून नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाऊ शकते, अशी सूत्रांची माहिती आहे. या संभाव्य विस्तारात बीडच्या परळीचे आमदार धनंजय मुंडे आणि मावळचे आमदार सुनील शेळके यांच्या नावांची जोरदार चर्चा सुरू आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या गोटात राजकीय घडामोडींना वेग आला आहे.**





धनंजय मुंडे यांनी मार्च २०२५ मध्ये मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. संतोष देशमुख हत्याप्रकरणातील काही आरोपींशी त्यांचे निकटचे संबंध असल्याचे आरोप झाल्यानंतर त्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर टीका झाली होती. जवळपास चार महिने सुरू असलेल्या राजकीय दबावानंतर त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. यानंतरही विरोधकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. त्यामुळे त्यांच्या पुनरागमनाबाबत अद्यापही राजकीय वर्तुळात मतमतांतरे आहेत. यापुर्वी अनेक कार्यक्रमांतून धनंजय मुंडे यांनी आपल्याला मंत्रीपदाची संधी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. अगदी राष्ट्रवादीच्या नु कत्याच झालेल्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमातही त्यांनी याबाबत खंत व्यक्त केली होती. ▶▶ पान २ वर

## बीड जिल्हा क्रीडा संकुलासाठी २४.९५ कोटी निधी

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा पाठपुरावा

मुंबई | प्रतिनिधी

बीड येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या उभारणीला गती देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. क्रीडा संकुलाच्या २४.९५ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास आणि निधी मंजुरीस मंगळवारी मंत्रिमंडळाने मान्यता दिली. दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्यकाळात या क्रीडा संकूलाच्या उभारणीला प्रशासकीय मंजूरी देण्यात आली होती. उपमुख्यमंत्री, क्रीडा मंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी या क्रीडा संकुलाच्या निधीसाठी सातत्याने केलेल्या विशेष पाठपुराव्यामुळेच हा मार्ग मोकळा झाला आहे.

बीड जिल्ह्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या क्रीडा संकुलाचे काम हाती घेण्यात आले आहे. या क्रीडा ▶▶ पान २ वर

## पेणमध्ये नसरापूरची पुनरावृत्ती?


### पाच वर्षांच्या मुलीची हत्या,संशयिताला अटक

पेण | प्रतिनिधी

पेण तालुक्यात पाच वर्षाच्या मुलीच्या हत्येची धक्कादायक घटना मंगळवारी उघडकीस आली. अत्याचारानंतर पीडितेची हत्या केल्याचा प्राथमिक अंदाज असून शवविच्छेदन अहवालातून अत्याचार केला की नाही हे स्पष्ट होईल. दुसरीकडे पोलिसांनी २४ वर्षांच्या संशयित आरोपीला अटक केली असून त्याला बुधवारी न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे.

पेण तालुक्यातील आदिवासीवाडीत राहणारी पाच वर्षांची मुलगी घरासमोर झोपली होती. मुलगी दिसत नसल्याने तिच्या आईवडिलांनी शोधाशोधही केली. शेवटी मुलगी बेपत्ता झाल्याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार नोंदवण्यात आली. ▶▶ पान २ वर

## भोजशाळेत शुक्रवारची नमाज पुन्हा सुरू करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार





दिल्ली | वृत्तसंस्था

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने भोजशाळा हे मंदिर घोषित केल्याच्या निकालाविरोधात मुस्लिम पक्षांनी केलेल्या अपीलावर सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी संमती दिली. मात्र भोजशाळा हा एक संवेदनशील विषय असल्याने हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही बाजूंनी संयम ठेवावा, असे आवाहन सर्वोच्च न्यायालयाने केले तसेच या ठिकाणी नमाज पठण करण्यास परवानगी देणारा कोणताही अंतरिम आदेश देण्यास नकार दिला.

न्यायालयाने मध्य प्रदेश सरकारला निर्देश दिले आहेत की, मुस्लिमांना शुक्रवारी दुपारी १ ते ३ या वेळेत नमाज अदा करण्यासाठी भोजशाळेला लागूनच असलेली खुली जागा उपलब्ध करून द्यावी.

### वैज्ञानिक सर्वेक्षणात काय आढळले?

उच्च न्यायालयाने ११ मार्च २०२४ रोजी एएसआयला भोजशाळा मंदिर-कमल मौला मशीद संकुलाचे वैज्ञानिक सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले होते. एएसआयने त्याच वर्षी २२ मार्च रोजी सर्वेक्षण सुरू केले आणि ९८ दिवसांच्या विस्तृत सर्वेक्षणांनंतर आपला अहवाल न्यायालयाला सादर केला. एएसआयने आपल्या २,००० पेक्षा जास्त पानांच्या अहवालात नमूद केले की, धारच्या परमार राजांच्या काळातील एक विशाल वास्तू या मशिदीच्या आधी अस्तित्वात होती आणि सध्याची वादग्रस्त वास्तू मंदिराचे अवशेष वापरूनच बांधली गेली आहे.

यासोबतच, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने न्यायालयाच्या परवानगीशिवाय भोजशाळेच्या मूळ रचनेत कोणतेही बदल करू नयेत, असेही आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणाची दररोज सुनावणी घेऊन हा मुद्दा निकाली काढण्यास तयार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. मुस्लिम पक्षाने या संकुलात नमाज पठणाचा अधिकार मिळावा यासाठी आग्रह धरला आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जोयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने सांगितले की, या प्रकरणात ▶▶ पान २ वर

## वैष्णो देवीत ५५० कोटींचा घोटाळा?

श्रीनगर | वृत्तसंस्था

जम्मू-काश्मीरमधील श्री माता वैष्णो देवी मंदिरात भाविकांनी अर्पण केलेल्या चांदीत मोठ्या प्रमाणात भेसळ झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सुमारे २० टनांहून अधिक चांदीत भेसळ असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, या प्रकरणाची गंभीर दखल घेत जम्मू न्यायालयाने पोलिसांना संपूर्ण नोंदी न्यायालयात सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, भाविकांनी श्री माता वैष्णो देवीच्या दरबारात वर्षानुवर्षे अर्पण केलेल्या २० टनांहून अधिक चांदीची बाजारातील किंमत सुमारे ५५० कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. मंदिर प्रशासनाने ही चांदी वितळवण्यासाठी पाठविल्यानंतर धक्कादायक माहिती समोर आली. तपासणीदरम्यान वितळलेल्या धातूमध्ये केवळ ५ ते ६ टक्केच शुद्ध चांदी आढळली, तर उर्वरित धातूमध्ये कॅडमियम, लोखंड आणि इतर मिश्रधातूंचे प्रमाण असल्याचे निष्पन्न ▶▶ पान २ वर



### तर आरएसएसने हिंमत दाखवावी- सपकाळ

संभाजीनगर | प्रतिनिधी

अयोध्येतील प्रभू रामाच्या मंदिरातील देणगीवर दरोडा टाकून भाजपा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेशी खेळ केला आहे. दरोड्यावर आता आरएसएस मधून नाराजी व्यक्त केली जात आहे पण नाराजी व्यक्त करून काही फायदा नाही, राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये ▶▶ पान २ वर






cmyk

## अग्रलेख

# संस्थांवर हल्ला ; आणीबाणीपेक्षाही मोठा धोका?

२५ जून १९७५. भारतीय लोकशाहीचा काळा दिवस. आणीबाणी लागू झाली. हजारो विरोधी नेते तुरुंगात गेले. वर्तमानपत्रांवर सेन्सॉरशिप लादली गेली. न्यायव्यवस्था, प्रसारमाध्यमे आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार अभूतपूर्व दबावाखाली आले. तो काळ भयानक होता, पण निदान एक गोष्ट स्पष्ट होतीदेशाला माहिती होते की लोकशाहीवर हल्ला झाला आहे.

आज प्रश्न वेगळा आहे. जर लोकशाहीवरचा दबाव उघडपणे न येता संस्थांना आर्थिकदृष्ट्या कमकुवत करून, संशोधनावर परिणाम करून आणि प्रश्न विचारणाऱ्या आवाजांना एकटे पाडून येत असेल, तर तो अधिक धोकादायक नाही का? हा प्रश्न केवळ राजकीय नाही; तो भारताच्या लोकशाहीच्या भवितव्याशी संबंधित आहे. याच पार्श्वभूमीवर Centre for the Study of Developing Societies (CSDS) या देशातील प्रतिष्ठित संशोधन संस्थेबाबत निर्माण झालेला वाद महत्त्वाचा ठरतो. १९६३ पासून ही संस्था भारतीय लोकशाही, निवडणुका, समाजरचना आणि सार्वजनिक धोरणांचा अभ्यास करत आहे. हे निवडणूक सर्वेक्षण देश-विदेशात संदर्भ म्हणून वापरले जाते. १९६९ पासून आयसीएसएसआर मार्फत या संस्थेला सरकारी अनुदान मिळत आले आहे. सार्वजनिक आर्थिक माहितीनुसार, २०२४-२५ मध्ये संस्थेच्या उत्पन्नापैकी सुमारे ८३ टक्के निधी आयसीएसएसआर कडून आला होता. त्यामुळे या अनुदानावरील कोणतीही कारवाई ही केवळ आर्थिक बाब राहत नाही; ती संशोधनाच्या सातत्यावरही परिणाम करू शकते. वादाची सुरुवात एका सोशल मीडिया पोस्टपासून झाली. प्राध्यापक संजय कुमार यांनी महाराष्ट्रातील मतदारसंख्येबाबत माहिती प्रसिद्ध केली. नंतर त्यांनी ती माहिती चुकीची असल्याचे मान्य केले, पोस्ट मागे घेतली आणि सार्वजनिक माफी मागितली. त्यानंतर आयसीएसएसआरने कारणे दाखवा नोटीस बजावली. पुढे अनुदानाबाबत कारवाईची शिफारस झाल्याच्या बातम्या समोर आल्या. येथे सरकारला विचारण्यासारखे काही मूलभूत प्रश्न आहेत. एका संशोधकाच्या चुकीसाठी संपूर्ण संशोधन संस्थेच्या आर्थिक स्थैर्यावर परिणाम करणारी कारवाई करणे योग्य आणि प्रमाणबद्ध ठरते का? अशीच भूमिका इतर सर्व संस्थांच्या बाबतीतही समान निकषांवर घेतली जाते का? अनुदानावरील निर्णयांसाठी स्पष्ट, सार्वजनिक आणि सर्वांना समान लागू होणारे निकष आहेत का? लोकशाहीत उत्तरदायित्व आवश्यक आहे. चुकीची माहिती दिल्यास कारवाई झालीच पाहिजे. पण कारवाई आणि संस्थात्मक स्वायत्तता यांच्यातील समतोल तितकाच आवश्यक आहे. याच संदर्भात Centre for Policy Research (CPR) या संस्थेवरील एफसीआरए कारवाई आणि इतर प्रशासकीय निर्णयांचाही उल्लेख सार्वजनिक चर्चेत वारंवार केला जातो. या प्रत्येक प्रकरणात सरकारने कायदेशीर कारणे दिली आहेत, तर संबंधित संस्थांनी काही निर्णयांवर आक्षेप घेतला आहे. त्यामुळे निष्कर्ष गृहीत धरण्याऐवजी एक व्यापक प्रश्न विचारणे आवश्यक आहेस्वतंत्र संशोधन संस्थांवरील प्रशासकीय आणि आर्थिक दबाव वाढत असल्याची धारणा का निर्माण होत आहे? लोकशाही केवळ मतदानावर उभी राहत नाही. स्वतंत्र न्यायव्यवस्था, मुक्त प्रसारमाध्यमे, स्वायत्त विद्यापीठे आणि संशोधन संस्था हे तिचे चार मजबूत स्तंभ आहेत. यापैकी एखादा स्तंभ कमकुवत झाला, तर लोकशाहीची गुणवत्ता कमी होऊ लागते. सरकार कोणत्याही पक्षाचे असा`काँग्रेस, भाजप किंवा इतर. एक प्रश्न कायम राहतो. सत्तेला अस्वस्थ करणारे संशोधनही तितक्याच स्वातंत्र्याने होऊ शकते का? सरकारी निधीवर चालणाऱ्या संस्थांना सरकारवर टीका करण्याचे स्वातंत्र्य प्रत्यक्षात कितपत आहे? टीका आणि संस्थात्मक दंड यांच्यातील सीमा कोण ठरवते? हे प्रश्न विचारणे म्हणजे सरकारविरोधी भूमिका घेणे नाही; उलट लोकशाहीला अधिक उत्तरदायी बनवण्याचा प्रयत्न आहे. १९७५ मध्ये सेन्सॉरशिप लाल पेन्सिलने दिसत होती. आज जर दबाव आर्थिक, प्रशासकीय किंवा संस्थात्मक स्वरूपात असेल, तर तो अधिक सूक्ष्म असू शकतो. म्हणूनच त्याची चर्चा अधिक जबाबदारीने आणि तथ्यांच्या आधारे होणे गरजेचे आहे.

लोकशाहीचा ऱ्हास अनेकदा एका दिवसात होत नाही. तो हळूहळू होतोसंस्थांची स्वायत्तता कमी होत जाते, संशोधन कमकुवत होते, प्रश्न विचारणारे कमी होतात आणि सार्वजनिक चर्चा गरीब होत जाते. भारतातील लोकशाहीची खरी ताकद सरकारच्या बहुमतात नाही; तर सरकारला प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य असलेल्या संस्थांमध्ये आहे. म्हणूनच आज सरकारसमोर एक स्पष्ट प्रश्न उभा आहे. स्वतंत्र संशोधन संस्थांवर विश्वास वाढवण्यासाठी, अनुदान निर्णय अधिक पारदर्शक करण्यासाठी आणि संस्थात्मक स्वायत्ततेचे संरक्षण करण्यासाठी सरकार कोणती ठोस पावले उचलणार आहे? या प्रश्नाचे उत्तर केवळ सीएसडीएस साठी महत्त्वाचे नाही; ते भारताच्या लोकशाहीच्या भविष्यासाठी महत्त्वाचे आहे.

## चिंतामुक्त आणि समाधानी राहा-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**



**वाढत्या वयानुसार शरीरात बदल होणे स्वाभाविक आहे, पण अनेकदा आपण हे विसरतो की आपले मनही वयानुसार जुळवुन घेण्याच्या प्रक्रियेतून जाते. जर याला योग्य दिशा मिळाली तर ६० वर्षानंतरचे जीवन चिंतामुक्त आणि समाधानी असु शकते.**

सामाजिक सहभाग आणि छंदाचा आनंद - छंद जोपासा : बागकाम, वाचन किंवा संगीत यासारखे छंद सुरु ठेवा. कटुंब आणि मित्र : नातवंडासोबत वेळ घालवा,जुन्या मित्रांशी बोला. मानसिक आधार :- तणाव किंवा चिंता जास्त असल्यास या सारख्या फ्लॅटफॉर्मवर व्यावसायिक थेरपिस्टची मदत घ्या. सकारात्मक दृष्टिकोन वय विसरा :-वयाचे आकडे सोडून द्या. अनुभवांनचा अभिमान बाळगा. तुलना टाळा :- इतरांशी तुलना करु नका जे मिळाले आहे त्यात समाधान माना. आनंदी राहा:- आनंदी आणि सकारात्मक लोकांच्या सहवासात राहा. मनाची शांतता आणि ध्यान ध्यान: दररोज थोडा वेळ ध्यानाला द्या.यामुळे मन शांत होते आणि ताणतणाव कमी होतो. प्राणायाम :- योगासने आणि प्राणायाम केल्याने शरीरात ऑक्सिजन वाढतो. यासाठी सरल सत्य लेगसी वरील माहिती उपयुक्त ठरेल. आंतरिक शांतता :- वयानुसार भावनांवर अधिक नियंत्रण येते.या वेळेचा आनंद घ्या. शारिरीक आरोग्य आणि आहार. पौष्टिक आहार : फळे आणि पालेभाज्यांचा आहारात भरपूर समावेश करा. नियमित व्यायाम :- रोज चाला किंवा हलका व्यायाम करा. व्यायामामुळे शरीरात आनंदी संप्रेरक तयार होतात. मदत घ्या: वयोवृध्द व्यक्तींच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅर्डेलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# खा.डॉ.श्रीकांतजी शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे प्रवेश सोहळा

## अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली माजलगावात शिवसेनेचे संघटन मजबूत!



**बीड । प्रतिनिधी**

वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंदजी दिघे साहेब यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तसेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून माजलगाव विधानसभा मतदारसंघातील उबाठा गटातील अनेक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत काल दि. १३ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास मुंबई येथे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या प्रवेश सोहळ्यात डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांनी सर्व नवप्रवेशितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत त्यांच्या भावी राजकीय आणि सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी मंत्री मा. भरतसेठ गोगावले आणि शिवसेना उप नेत्या संगीताताई ठोंबरे, राज्य संघटन प्रमुख आनंद परांजपे, बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे, जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि जिल्हाप्रमुख सचिन मुळूक उपस्थित होते.

### अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून माजलगावात उबाठाला मोठा धक्का!

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल नगर जगताप यांच्या माध्यमातून माजलगावचे माजी नगरसेवक राम आनंद जगताप यांच्यासह अविनाश विश्वनाथ गोंडे (संचालक, छत्रपती सहकारी साखर कारखाना तथा माजी सरपंच, मोठेवाडी), ईश्वर प्रकाशराव होके (पाटील) (माजी नगरसेवक, माजलगाव), शिवकुमार भास्करराव माने (सरपंच, सुरूमगाव), उद्धवराव विठ्ठलराव धुमाळ (माजी संचालक, सहकारी साखर कारखाना), बबन थावरा पवार (माजी सरपंच, मोगरा), रणजीत भगवान जोगडे (संचालक, सेवा सहकारी सोसायटी), कुणाल मनोहर सोळंके (युवक नेते), अंगद शंकर खेत्री (ग्रामपंचायत सदस्य), जगन्नाथ सखाराम खेत्री (ग्रामपंचायत सदस्य), मोहन नवनाथराव थावरे (युवा नेते), मनोज थावरे (उपसरपंच), राजेभाऊ प्रभाकर पाष्टे (पत्रकार, दैनिक लोकमत), अर्जुन राजेभाऊ पांढरपोटे (चेअरमन, सह्याद्री अर्बन बँक) आणि बाळासाहेब बाबासाहेब तौर (चेअरमन, श्री दत्त अर्बन बँक) यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे माजलगाव विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेची संघटनात्मक ताकद आणखी बळकट झाली असून आगामी काळात पक्षाची ताकद अधिक वाढण्यास मदत होणार असल्याची भावना उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदाचा ॲड.नरसिंह जाधव यांचा राजीनामा

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी आपला राजीनामा प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याकडे पाठविला असून त्याची प्रत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार, खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार आणि आमदार जयंत पाटील यांनाही पाठविली आहे.**



पाटोदा येथील रहिवासी असलेले ॲड. नरसिंह जाधव हे छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालय वकील संघाचे माजी अध्यक्ष आहेत. त्यांचे वडील कै. ॲड. लक्ष्मणराव जाधव हे बीड जिल्ह्यात शरद पवार यांचे निकटवर्तीय सहकारी म्हणून ओळखले जात होते. त्यांनी पाटोदा पंचायत समितीचे सभापती म्हणूनही काम पाहिले होते. तसेच ॲड. जाधव यांचे बंधू शिवभूषण जाधव यांनी २०१९ ते २०२५ या कालावधीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या पाटोदा तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली होती. सन १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेपासून ॲड. जाधव पक्षाशी निष्ठेने जोडलेले होते. बीड लोकसभा निवडणुका तसेच आष्टी विधानसभा मतदारसंघातील विविध निवडणुकांमध्ये पक्षाच्या उमेदवारांच्या विजयासाठी त्यांनी सक्रियपणे काम केले. जिल्हा परिषद सदस्यांच्या अपात्रतेसह विविध निवडणूक विषयक कायदेशीर बाबींमध्ये त्यांनी पक्षाची भक्कम बाजू न्यायालयात मांडली. राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक आणि कायदेविषयक कामातही ॲड. जाधव यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. मराठवाड्यातील अनेक जनहिताच्या प्रश्नांवर त्यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केल्या. नारेगाव कचरा डेपो, चिकलठाणा परिसरातील अतिक्रमण, नारायण पुष्प सोसायटी रस्ता, बीड जिल्ह्यातील मंदिर-मशीद जमीन प्रकरणे, पैठणपंढरपूर पालखी मार्ग, पाटोदा नगरपंचायतीतील कथित भ्रष्टाचार, मांजरा नदीवरील पुलाच्या कामातील अनियमितता तसेच अपात्र स्वातंत्र्यसैनिकांच्या प्रकरणांसह अनेक महत्त्वाच्या विषयांवर त्यांनी न्यायालयीन लढा उभारला. पाटोदा परिसरातील निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांविरोधात त्यांनी उपोषणही केले होते. त्यानंतर संबंधित ठेकेदाराला रस्त्याचे काम पुन्हा करावे लागले आहे. २०२४ मध्ये आष्टी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची तयारी केली होती. त्यासाठी त्यांनी मतदारसंघातील सुमारे २०० ते २५० गावांचा दौरा करून नागरिकांच्या समस्या जाणून घेत विविध प्रश्नांवर आवाज उठविला होता. आपल्या दीर्घ राजकीय प्रवासानंतर प्रदेश उपाध्यक्षपदाचा राजीनामा देत त्यांनी पक्षापासून दूर जाण्याचा निर्णय घेतला आहे. आता ते पुढे कोणती राजकीय भूमिका स्वीकारणार, याकडे बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागले आहे.

# तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट शाळेमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

**नवगण शिक्षण संस्था संचलित तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेमध्ये यावर्षीचे पहिल्या सत्रातील आरोग्य शिबिर संपन्न झाले आहे अशी माहिती शाळेचे मुख्याध्यापक श्री श्याम डाके सर यांनी दिली आहे.**



नवगण शिक्षण संस्थेची सचिव डॉक्टर योगेश भैया क्षीरसागर साहेब यांच्या प्रेरणेने विद्यालयांमध्ये द१रवर्षी विविध कार्यक्रम घेण्यात येत असतात त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांचे आरोग्य जपण्यासाठी विद्यार्थ्यांमधील हिमोग्लोबिन तपासून रक्तगट तपासून किंवा विद्यार्थ्यांना खोकला सर्दी ताप डोकेदुखी मुलींच्या विविध समस्या यावर मार्गदर्शन करण्यासाठी चौसाळा आरोग्य केंद्रातील डॉक्टर काटकर मॅडम डॉ श्रीमती थोरात मॅडम डॉ तांबोळी अनिस सर वर्षाताई काळे आशाताई गंगाताई काळे आशाताई यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य संबंधी वेगळे टिप्स देऊन संबोधन केले. मुलींशी सुसंवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेऊन आरोग्याबद्दल खाण्या पिण्याच्या वस्तूंबद्दल माहिती दिली आरोग्य कसे जपावे याबद्दल मार्गदर्शन सविस्तर केले.विद्यालय प्रमुख श्री डाके सर यांनी शाल श्रीफळ पुष्पहार देऊन सर्वांचा सत्कार केला. याप्रसंगी पालक कुचेकर यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वामने सर काशीद सर पवार सर सय्यद सर सेवक काळे काटवटे यांनी परिश्रम घेतले डॉ तांबोळी आणि सर यांनी विद्यार्थ्यांना खूप सुंदर असे मार्गदर्शन केले व कार्यक्रमाची सांगता नाश्ता व चहा पाणी झाली. सर्वांचे आभार मुख्याध्यापक श्री डाके सर यांनी मानले.

## पान १ वरून...

### निकषात सुधारणा; ३६

लाभ मिळणार असून, योजनेंतर्गत कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही. कर्जमाफीची अंमलबजावणी अधिक व्यापक आणि न्याय्य करण्याच्या उद्देशाने हे बदल करण्यात आल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. दरम्यान, मंत्रिमंडळ बैठकीत कृषी क्षेत्राशी संबंधित आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील मौजे दापचरी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी दापचरी येथील दुग्ध प्रकल्पाची ५५८.४३ हेक्टर जमीन महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य सरकारच्या मते, या कृषी बाजारामुळे शेतमालाची साठवणूक, प्रक्रिया, निर्यात, मूल्यवर्धन आणि आधुनिक विपणन व्यवस्था विकसित होण्यास मदत होईल. विशेषतः फळे, भाजीपाला, धान्य आणि इतर कृषी उत्पादनांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार असल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला अधिक चांगला बाजारभाव मिळण्यास मदत होईल. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत एकूण आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून, त्यामध्ये शेतकरी कर्जमाफीतील सुधारणा आणि दापचरी येथील आंतरराष्ट्रीय कृषी बाजार प्रकल्प हे दोन निर्णय विशेष महत्त्वाचे मानले जात आहेत.

------------

### भोजशाळेत शुक्रवारची नमाज पुन्हा सुरू

वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक शब्दाबाबत अत्यंत सावधगिरी बाळगावी लागेल. मुस्लिमांना भोजशाळा परिसरात शुक्रवारची नमाज पठण करण्याची परवानगी देणारा एएसआयचा २००३ चा आदेश मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने मे २०२६ मध्ये रद्द केला होता. उच्च न्यायालयाने आपल्या निकालात निरीक्षण नोंदवले होते की, भोजशाळेत संस्कृत शिक्षण केंद्र आणि देवी सरस्वतीचे मंदिर असल्याचे संकेत मिळतात. हिंदू समुदाय भोजशाळेला वाग्देवी (देवी सरस्वती) चे मंदिर मानतो. हे मंदिर राजा भोज यांनी बांधले होते. तर दुसरीकडे, मुस्लिम पक्षाचा दावा आहे की ही जागा शतकानुशतके कमल मौला मशीद म्हणून वापरात आहे. एएसआयच्या २००३ च्या व्यवस्थेनुसार, हिंदूंना मंगळवारी आणि मुस्लिमांना शुक्रवारी अनुक्रमे पूजा आणि नमाज करण्याची परवानगी होती. परंतु, हिंदू पक्षाने या आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान देत, या संकुलात केवळ स्वतःलाच पूजेचा अधिकार मिळावा अशी मागणी केली होती.

--------

### तुकाराम मुंढेंचा धडाका ; मुंबईतील तीन

अचानक तपासणी केली असता, तिथे स्वच्छता, अन्नसुरक्षा आणि परवाना नियमांचे गंभीर उल्लंघन होत असल्याचे उघडकीस आले. तपासणीदरम्यान हॉटेल्सच्या स्वयंपाकघरात प्रचंड अस्वच्छता आढळून आली, तसेच तिथे कीटकांचा वावर असल्याचेही स्पष्ट झाले. ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेची कोणतीही तपासणी केली नसल्याचे समोर आले. हॉटेलमध्ये वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाच्या खरेदीच्या नोंदी आणि वापरल्या जाणाऱ्या खाद्यतेलाच्या गुणवत्तेच्या नोंदी ठेवल्या गेल्या नव्हत्या. या सर्व त्रुटींमुळे ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असल्याचे स्पष्ट करत एफडीएने थेट निलंबनाची कारवाई केली. दरम्यान, मुंबईव्यतिरिक्त एफडीएने आपला मोर्चा विदर्भाकडेही वळवला आहे. अमरावती येथील प्रसिद्ध अमरावती दरबार या हॉटेलला कोणतीही वैध अन्न परवाना नसताना व्यवसाय चालवल्याप्रकरणी नोटीस बजावण्यात आली आहे. वैध परवाना मिळेपर्यंत हा व्यवसाय पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश एफडीएने दिले आहेत.

------------

### पेणमध्ये नसरापूरची

पोलिसांच्या पथकाने परिसरात शोधमोहीम हाती घेतली. मंगळवारी सकाळी श्वानपथकही घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळी जिल्हा पोलीस अधीक्षक अंचल दलाल, अतिरिक्त पोलीस अधीक्षक फडतरे, पेण पोलीस निरीक्षक जाधव व इतर कर्मचाऱ्यांनी श्वान पथकासहित शोध घेतला असता आरोपीचा शोध लागला. पोलिसांनी संशयित आरोपी किरण वाघमारे याला अटक केली आहे. तर पीडित मुलीचा मृतदेह तिच्या घरापासून १०० मीटर अंतरावर असलेल्या निर्जनस्थळी सापडला. पीडित मुलीच्या मृतदेहावर कपडे नव्हते तसेच जखमाही होत्या. यावरुन नराधम किरणने तिच्यावर अत्याचार केला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. पीडित मुलीचा मृतदेह हा शवविच्छेदनासाठी पेणमधील रुग्णालयात पाठवण्यात आले असून शवविच्छेदन अहवालातून अत्याचाराबाबतची माहिती समोर येईल. पेण तालुक्यात गेल्या सहा महिन्यातील अत्याचार आणि खुनाची ही दुसरी घटना आहे. पेण पासून सात किलोमीटर अंतरावर शितोळे वाडीच्या हद्दीत एका महिलेवर अत्याचार करून खून करण्यात आला होता. त्यातील दोन परप्रांतीय आरोपीना पेण पोलिसानी अटक केली होती. नसरापूर प्रकरणी कोर्टाने अवघ्या साठ दिवसांत निकाल दिला असतानाच आता पेण तालुक्यातही अशीच घटना घडल्याने संताप व्यक्त होत आहे.

------------

### बीड जिल्हा क्रीडा संकुलासाठी

संकुलाकरिता यापूर्वी ८ कोटी रुपये इतका निधी आधीच वितरित करण्यात आला होता. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडून सादर करण्यात आलेल्या २४.९९ कोटी रुपये किमतीच्या अंदाजपत्रकास विशेष बाब म्हणून उच्च स्तरीय सचिव समिती तसेच राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली होती. या मंजुरीच्या अनुषंगाने, ३१ मार्च २०२६ च्या शासन निर्णयान्वये २५ कोटी रुपये इतका निधी आधीच वितरित करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आणि स्थानिक तरुण खेळाडूंना दर्जेदार पायाभूत सुविधा मिळवून देण्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या सुरुवातीपासूनच आग्रही होत्या. या संकुलाच्या निधी वितरणात व प्रशासकीय मंजुऱ्यांमध्ये येणारे अडथळे दूर करून, अंदाजपत्रकाला मंत्रिमंडळाची अंतिम कार्योत्तर मान्यता मिळवून देण्यात त्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे बीड जिल्हा क्रीडा संकुलाच्या उर्वरित कामांना मोठी गती मिळणार असून, या भागातील क्रीडा संस्कृतीला अधिक बळ मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी व्यक्त केला.

-----------

### वैष्णो देवीत ५५०

झाले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात बनावट किंवा भेसळयुक्त चांदी मंदिरात अर्पण करण्यात आल्याचा संशय निर्माण झाला आहे. या प्रकरणानंतर जम्मूचे वकील दीपक शर्मा यांनी ९ मे रोजी क्राइम ब्रँचचे पोलिस महानिरीक्षक आणि आर्थिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस अधीक्षक यांच्याकडे सविस्तर तक्रार दाखल केली. या तक्रारीत मंदिरात अर्पण झालेल्या चांदीत भेसळ करण्यात आली असावी किंवा मूळ चांदीची अदलाबदल झाली असण्याची शक्यता व्यक्त करत गुन्हा दाखल करून सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

-------------

### आरोपींना काढण्याची हिम्मत

हिम्मत असेल तर मर्यादा पुरुषोत्तम प्रभूरामाच्या नावावर अब्जावधी रुपयांचा दरोडा टाकणाऱ्या संघाशी संबंधित सर्वांना संघातून निष्काशित करावे, असे आव्हान महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा विभागाची जिल्हानिहाय आढावा बैठक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला खासदार डॉ. कल्याण काळे, खा. डॉ. शिवाजीराव काळगे, खा. रविंद्र चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील, संभाजीनगर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण पाटील डोणगावकर, संभाजीनगर शहर काँग्रेसचे अध्यक्ष अक्रम सय्यद अब्बास, प्रवक्ते हनमंत पवार, सुरेंद्र घोडसकर यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, राम मंदिराचा वापर भाजपा व रा.स्व. संघाने स्वतःच्या फायद्यासाठी केला. मंदिर निर्माण व प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाचा मोठा इव्हेंट करून सर्व श्रेय आपल्याच पदरात कसे पडेल यासाठी आटापिटा केला. पण त्यांचा खरा चेहरा आता उघड झाला आहे. श्रीरामाला भक्तिभावाने दान दिलेल्या पैशांवरच या लोकांनी दरोडा टाकला. या दरोड्याला सर्व विश्वस्त मंडळच जबाबदार आहे. मंदिरातील आर्थिक व्यवहाराचा हिशोब ठेवण्याची जबाबदारी कोषाध्यक्ष यांचीच आहे. पण दरोड्याशी माझा संबंध नाही, असे जर ते म्हणत असतील तर ते हास्यास्पद आहे. विश्वस्त मंडळाची आताची भूमिका 'तो मी नव्हेच' अशी आहे, असा आरोपही यावेळी केला.

-------------

**मंत्रिमंडळाचा विस्तार :**

दुसरीकडे मावळचे आ. सुनील शेळके यांच्याही नावाची मंत्रिपदासाठी चर्चा सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून संघटनात्मक आणि प्रादेशिक समतोल साधण्यासाठी काही नवीन चेहऱ्यांना संधी दिली जाऊ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दरम्यान, भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्या मंत्रिमंडळातील काही खात्यांमध्येही फेरबदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काही विद्यमान मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा घेऊन नव्या आमदारांना संधी दिली जाऊ शकते, अशीही चर्चा आहे.

**जा.क्र./न.प./अंबड/हस्तांतरण/२०२६**
**कार्यालय नगर परिषद अंबड**
**दिनांक :- १४/०७/२०२६**

### नांव बदलण्याचा
## जाहीरनामा

अर्जदार श्री/श्रीमती १. सिमा यशवंत अवचार, २.सुवर्णा यशवंत अवचार,३.सुजाता यशवंत अवचार, ४.सारीका यशवंत अवचार,५. अरूण यशवंत अवचार, ५.दिपाली यशवंत अवचार

प्रकरणः प्लॉट नं १८-८९-०५ चे वारसाने हस्तांतरण करणे.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याव्दारे कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला.....येथे इमारतीचे / जागेचे नांव बदलून घेऊ इच्छितो ज्याची चतुःसीमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसीमाः पुर्व :- रस्ता, पश्चिम :-प्लॉट नं. १६ व १७, दक्षिण :- प्लॉट नं. ०६, उत्तर :- प्लॉट नं. ०४

**स्वाक्षरीत/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद अंबड**

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. १५ जुलै २०२६ | ३

## थोडक्यात



### २५ लाख वृक्ष लागवड संकल्पासाठी परिवर्तन पथनाट्य ग्रुपचे दिंद्रुडमध्ये जनजागृती पथनाट्य

दिंद्रुड : ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून २५ लाख वृक्ष लागवडीचा संकल्प हाती घेण्यात आला असून, या उपक्रमाअंतर्गत पर्यावरण संवर्धन आणि वृक्षसंवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

याच उपक्रमाचा भाग म्हणून परिवर्तन पथनाट्य, अंबाजोगाई यांच्या वतीने दिंद्रुड येथील डॉ. सोनाजीराव रांजवन माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन विषयावर प्रभावी जनजागृतीपर पथनाट्य सादर करण्यात आले.या पथनाट्यात शिवशाहीर तुकाराम महाराज सुवर्णकार, लोककलावंत प्रवीण जोगदंड, गायक महेश धायगुडे, गोविंद जोगदंड, आदित्य पवार, गोरखनाथ कसबे तसेच समन्वयक मधुकर उंडाळकर यांनी सहभाग घेतला. कलाकारांनी गीत, अभिनय आणि संवादांच्या माध्यमातून वृक्षांचे पर्यावरणीय महत्त्व, वृक्षारोपणाची गरज आणि लावलेल्या वृक्षांचे संवर्धन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवली. विद्यार्थ्यांनी पथनाट्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत पर्यावरण संरक्षणासाठी अधिकाधिक वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प व्यक्त केला.प्राचार्य गणेश उजगरे यांनी उपस्थित कलावंतांचे स्वागत केले.

### जेष्ठ समाजसेवक ॲड. सोपानराव तांगडे यांचे निधन

बीड । प्रतिनिधी



सामाजिक,शैक्षणिक, कायदे क्षेत्रातील अभ्यासू,प्रामाणिक आणि जनतेसाठी आयुष्यभर झटणारे ज्येष्ठ समाजसेवक ड.सोपानराव कोंडिबा तांगडे यांचे दुःखद निधन झाले.त्यांच्या निधनाने सामाजिक,शैक्षणिक आणि आंबेडकरी चळवळीची मोठी हानी झाली असून परिसरात शोककळा पसरली आहे.गजानन बँकेचे संचालक ॲड राजेश तांगडे यांचे ते वडील होत

ड.तांगडे यांनी १६ वर्षे शिक्षक म्हणून,१६ वर्षे पोलीस विभागात तसेच २५ वर्षे वकिली व्यवसायातून समाजसेवा केली. वंचित, शोषित आणि गरजू घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला.नगरसेवक म्हणून शहराच्या विकासातही त्यांनी मोलाचे योगदान दिले. दलित मित्र पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार, अनेक शैक्षणिक संस्था, वसतिगृहे,सामाजिक संस्था व मंडळांना मार्गदर्शन आणि उभारणीत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.त्यांच्या साधेपणा,प्रामाणिकपणा, कर्तव्यदक्षता आणि जनतेशी असलेल्या जिव्हाळ्यामुळे ते सर्वांच्या आदराचे स्थान होते.

त्यांच्यावर मंगळवारी सकाळी ९.०० वाजता भगवान बाबा प्रतिष्ठान येथे अंत्यविधी करण्यात येणार आहे.ड.सोपानराव तांगडे यांच्या निधनाबद्दल विविध सामाजिक,राजकीय, शैक्षणिक आणि कायदे क्षेत्रातील मान्यवरांनी शोक व्यक्त केला असून तांगडे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती लाभो,अशी सर्वत्र प्रार्थना व्यक्त होत आहे.

# नामकरणाच्या श्रेयवादात संत मुक्ताईंच्या आजोबा गोविंदपंत यांच्या समाधीची दुर्दशा विसरले का?

**समाधीचा जीर्णोद्धार रखडला; कोनशिला गळून पडली, संरक्षक भिंतीला तडे – पालकमंत्री सुनेत्रा पवार, आ.विजयसिंह पंडित यांनी लक्ष घालावे**

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील सुभाष रोडचे 'संत मुक्ताई मार्ग' असे नामकरण करण्यासाठी पुढाकार घेणारे लोकप्रतिनिधी, नगरपरिषदेचे पदाधिकारी आणि अधिकारी यांनी संत मुक्ताईंचे आजोबा गोविंदपंत यांच्या समाधीस्थळाच्या दुरवस्थेकडे मात्र दुर्लक्ष केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे. समाधीस्थळावरील रखडलेली विकासकामे तातडीने पूर्ण करून परिसराचा जीर्णोद्धार करावा, अशी मागणी त्यांनी पालकमंत्री सुनेत्रा पवार, आमदार विजयसिंह पंडित, आमदार संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी बीड आणि मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.



मुक्ताईंचे आजोबा गोविंद पंत यांच्या समाधीच्या संरक्षक भिंतीला तडे गेले आहेत.

डॉ. ढवळे यांनी निवेदनात म्हटले आहे की, दोन दिवसांपूर्वी सुभाष रोडचे 'संत मुक्ताई मार्ग' असे नामकरण करण्यात आले. मात्र बिंदुसरा नदीकाठी जैन भवन परिसरातील संत मुक्ताईंचे आजोबा गोविंदपंत यांच्या समाधीस्थळाची गेल्या पाच वर्षांपासून दुरवस्था झाली आहे. समाधीच्या जीर्णोद्धारासाठी उभारण्यात आलेली 'कोनशिला' गळून पडली असून संरक्षक भिंतीला मोठे तडे गेले आहेत. त्यामुळे या ऐतिहासिक व धार्मिक स्थळाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

याशिवाय नगरपरिषदेकडून सुमारे आठ वर्षांपूर्वी स्वच्छतागृह, सभागृह, भक्तनिवास आदी सुविधांच्या उभारणीसाठी काम सुरू करण्यात आले होते. काही पिलर उभारल्यानंतर कंत्राटदाराने काम अर्धवट सोडल्याने आजही भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. पुजाऱ्यांसाठी निवासव्यवस्था, भक्तनिवास, पिण्याच्या पाण्याची सुविधा नसून परिसरात फरशी किंवा पेव्हर ब्लॉकही टाकण्यात आलेले नाहीत. त्यामुळे पावसाळ्यात चिखल होत असून भाविकांची मोठी गैरसोय होत आहे.



मुक्ताईंचे आजोबा गोविंद पंत यांच्या समाधीची ' जिर्णोद्धार ' कोनशिला गळुन पडली आहे.

# जिल्हा बाल संरक्षण कक्षातील रिक्त पदांमुळे बीड जिल्ह्यातील बालकांच्या हक्कांची पायमल्ली

**सहा वर्षांपासून जे.जे. ॲक्टनुसार पदभरतीच नाही; शासनाने तातडीने कार्यवाही करावी –बाजीराव ढाकणे**

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील जिल्हा बाल संरक्षण कक्षामध्ये किशोर न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम (जे.जे. ॲक्ट) अंतर्गत आवश्यक पदभरती गेल्या सहा वर्षांपासून झालेली नसल्याने काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या हक्कांची पायमल्ली होत असल्याची खंत लेक लाडकी अभियान महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा समन्वयक तथा सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केली आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात ढाकणे यांनी म्हटले आहे की, जिल्हा बाल संरक्षण कक्ष हा अनाथ, निराधार, बेवारस, अत्याचारग्रस्त, बालमजुरीत अडकलेली, बालविवाहाच्या धोक्यात असलेली तसेच इतर संकटग्रस्त बालकांच्या संरक्षण व पुनर्वसनासाठी कार्य करणारी अत्यंत महत्त्वाची यंत्रणा आहे. मात्र या कक्षातील विविध पदे दीर्घकाळ रिक्त असल्याने बाल संरक्षणाशी संबंधित कामकाजावर गंभीर परिणाम होत आहे.

बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ, बालगृहे, स्पॉन्सरशिप, फोस्टर केअर, दत्तक प्रक्रिया तसेच पुनर्वसनाशी संबंधित विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षित अधिकारी व कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते. मात्र मनुष्यबळाच्या अभावामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असून अनेक प्रकरणांच्या निपटाऱ्यास विलंब होत आहे. परिणामी, गरजू बालकांना वेळेत संरक्षण, समुपदेशन, पुनर्वसन आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे बाजीराव ढाकणे यांनी नमूद केले. बालकांच्या हिताशी संबंधित हा अत्यंत गंभीर प्रश्न असून महिला व बाल विकास विभागाने याची तातडीने दखल घेणे आवश्यक आहे. जिल्हा बाल संरक्षण कक्षातील सर्व रिक्त पदे नियमित पद्धतीने भरून ही यंत्रणा सक्षम करावी, तसेच प्रत्येक गरजू बालकाला कायद्याने अपेक्षित संरक्षण व न्याय मिळेल यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी केली आहे. बालकांचे संरक्षण ही शासन आणि समाजाची संयुक्त जबाबदारी असून बालहक्कांशी संबंधित पदे वर्षानुवर्षे रिक्त ठेवणे हे दुर्दैवी असल्याचे सांगत शासनाने तातडीने पदभरती प्रक्रिया राबवावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## पान ६ वरुन...

### स्व.अजितदादा पवार जयंती व

आणि ग्रामीण विकासाशी संबंधित विषयांवर त्यांनी सातत्याने पाठपुरावा करून जनहिताचे निर्णय घडवून आणण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांना अधिकाधिक लाभ मिळावा, त्यांच्या अडचणी दूर व्हाव्यात आणि ग्रामीण भागाचा विकास व्हावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. स्व. अजितदादा पवार जयंती व माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने सर्व उपक्रमांच्या माध्यमातून समाजसेवेचा संदेश अधिक दृढ होणार असून,परिसरातील व्यापारी वर्ग, नागरिक, शेतकरी बांधव, विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन सभापती सूर्यभान (नाना) मुंडे व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने केले आहे.

### तुकाराम मुंढेंना साखर

शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण असलेल्या या अधिकाऱ्याने साखर क्षेत्राची अतिरिक्त जबाबदारी स्वीकारल्यास अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या गैरप्रकारांवर पडदा उघडला जाईल असा दावा थावरे यांनी केला. माजलगावचे कारखानदार असलेले आमदार प्रकाश सोळंके यांनी तुकाराम मुंढे यांची अन्न व औषध प्रशासन विभागात कायम नियुक्ती करावी, अशी मागणी केली आहे. मात्र मुंढे साखर आयुक्त झाले तर कारखानदारांच्या कारभाराची खरी तपासणी होईल, म्हणूनच त्यांना त्या पदापासून दूर ठेवण्याची धडपड सुरू आहे का? असा उपरोधिक सवाल थावरे यांनी उपस्थित केला. साखर आयुक्तपदाचा अतिरिक्त कार्यभार मुंढेंकडे दिल्यास शेतकऱ्यांच्या उसाला न्याय मिळण्यास मदत होईल, असा विश्वासही थावरे यांनी व्यक्त केला.

### अन्यायकारक टोल वसूली

स्थानिक वाहनांना टोल माफी नाही दिल्यास यापेक्षा आक्रमक आंदोलन करण्याचा इशारा देखील जिल्हाध्यक्ष कुलदीप यांनी दिला यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे केज युवा तालुकाध्यक्ष अतुल गवळी ,केज शहराध्यक्ष फेरोजभाई पठाण ,अजय वाघमारे, बाबा देशमुख, पिनू गोरे ,सोनू सूर्यवंशी ,दादासाहेब गुंड, महेश मोरे आदि पदाधिकारी ,वाहनधारक,शेतकरी उपस्थित होते. मंडळाधिकारी श्री.ढाकणे यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारले .आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी केज पोलिसांनी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.टोलनाक्यावरील चक्काजाम आंदोलनामुळे रस्त्याच्या दोन्ही कडेला वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागल्या होत्या.स्थानिक वाहनांना टोलमुक्त केल्याशिवाय ही लढाई थांबणार नाही .उपस्थित आंदोलकांनी एकजुटीने निर्धार केला.

### अवैध वाळू वाहतूक

ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उप विभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या पथकाने केली आहे. या कारवाईत ग्रेपोउपनि. श्रीमंत उबाळे, कल्याण राठोड, गोरक्ष डोके, जितेंद्र ओव्हाळ, रामराजे काकडे, विनोद कुटे, इसाक शेख आणि राजेंद्र सांगळे यांनी सहभाग घेतला.

### हॉटेल गोल्डन चॉईस मध्ये

रुचकर व स्वादिष्ट असलेल्या शाकाहारी जेवण सुद्धा हॉटेल गोल्डन चॉईस चे खास विशिष्ट आहे . याशिवाय वेगवेगळ्या प्रकारचा उत्कृष्ट नाष्टा देखील ग्राहकांच्या आवडीची असल्यामुळे प्रसिद्ध आहे एकदा या हॉटेल मध्ये जेवण किंवा नाश्ता करून गेलेला ग्राहक पुन्हा पुन्हा आवर्जून येथे येतात त्यामुळे ग्राहकांच्या आग्रहास्त हॉटेल गोल्डन चॉईस मध्ये १५ जुलैपासून नॉनव्हेज पदार्थ व उत्कृष्ट जेवणाची व्यवस्था करण्यात येत असल्याचे हॉटेल व्यवस्थापनाने म्हटले आहे.

### उमरी फाटा येथे भव्य

नाही. याचा विचारा शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने बीड – पिंपळनेर रोडवरील उमरद खालसा फाटा (उमरी फाटा) येथे रस्ता रोको करून शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदार यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले यावेळी राजेंद्र आमटे, बाळासाहेब मोरे, राहुल टेकाळे, अशोक येडे,रोहिदास मस्के, सुभाष गिराम, उमेश मस्के खाजाभाई पठाण, दीपक जाधव, वाणी अण्णा,जालिंदर शिंदे, बळीभाऊ मेहेत्रे,राजाभाऊ साळुंके,मसुराम साळुंके,खांडे पारगाव, नागापूर ( खुर्द, बुद्रुक) अंतरवन पिंपरी, उमरी, उमरद खालसा, बऱ्हाणपूर भाटसांगवी, राक्षस भुवन कुक्कडगाव वडगाव गुंदा, म्हाळस जवळा, म्हासापूर, पिंपळगाव मांजरा, इट गंगनाथवाडी व पिंपळनेर या परिसरातील हजारो शेतकरी उपस्थित होते.

# सायबर फ्रॉड गुन्ह्यातील फिर्यादीस एक लाख रुपये मिळवून देण्यात ॲड. किशोर खेडकर यांना यश

बीड । प्रतिनिधी

सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी कायदेशीर लढा उभारणे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. अशाच दोन सायबर गुन्ह्याच्या फिर्यादीस मा.०५ वे मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालय बीड यांनी दी ०२/०७/२०२६ रोजी सदरील की.फो क्र : ५५९/२०२६ व की.फो क्र ५६१/२०२६ या प्रकरणात ड. किशोर खेडकर यांनी दोन्ही फिर्यादीची बाजू सक्षमपणे मांडत न्यायालयातून एक लाख रुपये नुकसान भरपाई मिळवून दिली आहे.फिर्यादीचे खाते देखील सुरळीत चालू करून देण्यात आले आहे. या संबंधित प्रकरणात आज दि १४/०७/२०२६ रोजी सुनावणीत मा. न्यायालयाने आदेश दिले.



सदर प्रकरणात फिर्यादीची ऑनलाईन फसवणूक होऊन आर्थिक नुकसान झाले होते. तपासा दरम्यान व न्यायालयीन प्रक्रियेत ॲड. किशोर खेडकर यांनी सखोल अभ्यास, ठोस पुरावे आणि कायद्याच्या तरतुदींचा योग्य वापर करत फिर्यादीस न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी युक्तिवाद केला. परिणामी, न्यायालयाने आरोपींकडून फिर्यादीस एक लाख रुपये देण्याचे आदेश दिले.

या निर्णयामुळे सायबर गुन्ह्यांबाबत जनतेमध्ये जागरूकता वाढण्यास मदत होणार असून पीडितांना कायदेशीर मार्गाने दिलासा मिळू शकतो, हे अधोरेखित झाले आहे. या कामी ड.विराट बारगजे याचे सहकार्य लाभले ड. किशोर खेडकर यांच्या या यशस्वी कामगिरीबद्दल कायदेशीर क्षेत्रातून कौतुक होत आहे.

# कराटे ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया, माजलगावच्या वतीने बेल्ट परीक्षा व पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

कराटे ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया, माजलगाव यांच्या वतीने आयोजित बेल्ट परीक्षा व पारितोषिक वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात विविध वयोगटातील एकूण २० विद्यार्थ्यांनी बेल्ट परीक्षेत सहभाग नोंदवत उत्कृष्ट कामगिरी करत पुढील बेल्टसाठी पात्रता मिळवली. यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बेल्ट, प्रमाणपत्रे व पारितोषिके प्रदान करून गौरविण्यात आले.




कार्यक्रमाचे मुख्य आयोजक सोहेल बागवान सर यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. बेल्ट परीक्षेसाठी मुख्य परीक्षक (उहळशष एुराळपशी) रेन्शी शेख माजेद सर यांनी विद्यार्थ्यांची कसून परीक्षा घेतली. तसेच अमान मोमीन सर, रय्यान मोमीन सर आणि शेख अमान सर यांनी प्रशिक्षण व कार्यक्रमाच्या नियोजनात मोलाचे योगदान दिले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सहाल भैय्या चाऊस (उप नगरध्यक्ष, माजलगाव नगर परिषद), लतीफ पठाण सर (व्याख्याता, सुंदरराव सोलंके महाविद्यालय), शाहिद मणियार साहेब (भावी नगरसेवक) तसेच खतीब साहेब समीर शेख यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत कराटे हे केवळ खेळ नसून आत्मसंरक्षण, शिस्त, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. पालकांनीही विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक करत प्रशिक्षकांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांनी सर्व मान्यवर, पालक आणि उपस्थितांचे आभार मानले. विद्यार्थ्यांचा उत्साह, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्यामुळे हा बेल्ट परीक्षा व पारितोषिक वितरण सोहळा अत्यंत यशस्वी आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

---

**जाहिर प्रगटन**

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१४२७ दिनांक-२१/११/२०२५

अर्जदार श्रीमान/श्रीमती गणेश विश्वंभर उडदंगे रा.चंदनापुरी खु.ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | गणेश विश्वंभर उडदंगे | स्वत: | ०१/०३/१९८९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- / /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**जाहिर प्रगटन**

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१६९७ दिनांक-३०/१२/२०२५

अर्जदार श्रीमान/श्रीमती सय्यद शाहीन चुन्नुमियाँ रा.अंबड ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | सय्यद शाहीन चुन्नुमियाँ | स्वत: | ०१/०३/१९८८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ३०/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**जाहिर प्रगटन**

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१६९८ दिनांक-३०/१२/२०२५

अर्जदार श्रीमान/श्रीमती शाहीन अझमतखाँ पठाण रा.धाकलगाव ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | आलिया अझमतखाँ पठाण | मुलगी | ०१/०१/२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ३०/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**जाहिर प्रगटन**

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-८१६ दिनांक-१४/०७/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती बालाजी शिवाजी खोजे रा.साडेगाव ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या मुलीच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | श्रेया बालाजी खोजे | मुलगी | २५/०८/२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १४/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# देशातील सर्वात मोठे ॲग्रीकल्चरल कन्व्हेंशन सेंटर नागपुरात

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली पाहणी

नागपूर / प्रतिनिधी

अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असे देशातील सर्वात मोठे इंटरनॅशनल ॲग्रीकल्चरल कन्व्हेंशन अँड एक्झिबिशन सेंटर नागपुरातील दाभा परिसरात उभारले जात असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कामाची पाहणी करून कामाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. कृषी प्रदर्शनाशिवाय अन्य प्रदर्शने, परिषदा याकरिता कन्व्हेंशन व्हेन्यू म्हणून हे सेंटर जगभर ख्यात होईल आणि नागपूर शहराला एक वेगळी ओळख त्यामुळे मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

दाभा गावालगत पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या २१.७ हेक्टर जागेत राज्य सरकारतर्फे हे सेंटर उभारले जात आहे. विमानतळ, रेल्वे स्थानक यापासून अगदीच कमी अंतरावर हे सेंटर आहे. झिरो माईलपासून या सेंटरचे अंतर अवघे ७.८



कि.मी. आहे. चारही दिशांनी असलेली कनेक्टिव्हिटी हे या सेंटरचे वैशिष्ट्य आहे. सेंटरच्या बाहेरील भागात लँडस्केप, कारंजे राहतील. आतील भागात कॉन्फरन्स व सेमिनार हॉल, बोर्ड रूम, डायनिंग हॉल असेल. याशिवाय भव्य पार्किंग या ठिकाणी असणार आहे. दुचाकी, चारचाकींसह बसेससाठीही मोठी पार्किंग व्यवस्था या ठिकाणी करण्यात येत आहे. दोन हजार आसन क्षमतेचे ऑडिटोरियम हे येथील आणखी एक वैशिष्ट्य आहे. येथील सभागृह आकारमानाने देशातील सर्वात मोठे सभागृह असणार आहे.

अग्निसुरक्षेच्या सर्व अत्याधुनिक उपाययोजना या ठिकाणी करण्यात येत आहेत. हा प्रकल्प उभारण्याची जबाबदारी एमएसआयडीसीला देण्यात आली आहे. अधीक्षक अभियंता नरेश बोरकर यांनी यावेळी सादरीकरणाद्वारे प्रकल्पाची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली. सध्या या प्रकल्पाचे ६० टक्के काम पूर्ण झाले असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी एमएसआयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित, खासदार मायाताई इवनाते उपस्थित होते.

## तणनाशक फवारणी करताना याची घ्या काळजी

सध्या खरीप हंगामातील पेरण्या शेवटच्या टप्प्यात आहेत. ज्या पिकांची पेरणी किंवा लागवड होऊन महिन्यापेक्षा जास्त कालावधी लोटला आहे, अशा शेतात सध्या आंतर मशागतीचे काम सुरू असेल. यापैकी तणनियंत्रण किंवा तणनाशक फवारणी हे महत्त्वाचे कार्य आहे. लागली आहेत. मात्र अनेकजण चुकीच्या पद्धतीने तणनाशकाची फवारणी करत असल्याने त्याचा फायदा होण्यापेक्षा नुकसानच होताना दिसत आहे. जाणून घेऊ या तणनाशक फवारणीसाठी लक्षात ठेवण्याच्या महत्त्वाच्या बाबी. ग्रामीण भागात शेतात निंदण कामासाठी मजूरांचा फार मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला आहे. पूर्वीसारखे शेतमजूर उपलब्ध होत नसल्याने शेतकरी तणनाशक फवारणीकडे वळले आहेत. यामुळे कमी वेळात आणि कमी खर्चात तणनियंत्रण होते.

पिकातील तण आणि उपयुक्त तणनाशके : सूचीपर्णी पिकांसाठी: गहू, भात, ऊस, ज्वारी, आदी पिकांमध्ये २-४ डी हे हार्मोनवर्धक तणनाशक फवारले जाते. चपट्या पानांच्या पिकांसाठी: कापूस पिकांतील तणनाशक फवारण्यासाठी पेंडीमेथैलिन याची फवारणी केली जाते. सर्व प्रकारच्या तणांच्या समूळ उच्चाटनासाठी: सर्व प्रकारच्या



तणांच्या नियंत्रणासाठी जेव्हा पीक उभे नसेल तेव्हाच राउंडअप फवारणी केले जाते. तणनाशक फवारणीसाठी महत्त्वाच्या बाबी : जमिनीत ओलावा असताना तणनाशकाची फवारणी केल्यास ते अधिक फायदेशीर ठरत असल्याचे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे जमिनीत चांगला ओलावा निर्माण झाला व थोडीशी उघडीप मिळताच शेतकर्यांनी तणनाशक फवारणी करावी. काही शेतकरी कोरड्यावरच फवारणी करीत आहेत; अशा कोरड्या जमिनीत तणनाशक फवारणी टाळावी. तण कोवळे असताना तणनाशक फवारल्यास ते त्यावर मारक ठरते. कोवळे तण लवकर मरते. शक्यतो जमिनीत ओलावा असतानाच तणनाशकांची फवारणी करावी, तणनाशक फवारणीनंतर जमिनीला पाणी देऊ नये अन्यथा तणनाशकाचा पाहिजे तेवढा परिणाम होणार नाही. तणनाशक फवारणी केलेली टाकी तसेच फवारणी पंप लगेच दुसर्या पिकांवर फवारणीसाठी उपयोगात आणू नये. तो पंप स्वच्छ, गरम पाण्याने साफ करूनच त्याचा वापर करावा. बाजारात अनेक प्रकारची तणनाशके उपलब्ध आहेत. पिकांमध्ये कोणत्या प्रकारचे तण अधिक आहे, त्यानुसार तणनाशक खरेदी करावे. चुकीचे तणनाशक फवारणी केल्यास पिकांना याचा फटका बसतो. जमिनीची गुणवत्ता आणि प्रकार बघूनच तणनाशक फवारणी करावे. अनेकदा हलक्या जमिनीत घातक तणनाशक फवारणी केल्यास याचा पिकांच्या उत्पादनासह जमिनीच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. तणनाशक फवारणी करताना जमिनीत ओलावा असावा, वातावरण चांगले असावे, स्वच्छ पाणी, स्वच्छ पंप, कीटकनाशकापासून तणनाशक दूर ठेवणे, आदी काळजी घ्यावी लागते.

## पावसाचा खंड पडल्यास पिकांची काळजी

राज्यात पावसाने उशिरा हजेरी लावली, शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या. परंतु आता पुन्हा शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. पेरणीनंतर पावसाचा खंड पडल्यास शेतकऱ्यांनी पिकामध्ये दुबार पेरणी, जमिनीतील ओलावा टिकवणे, अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन, आंतरमशागत आणि नियमित कीड रोग निरीक्षण यावर भर द्यावा.

पेरणीनंतर पावसाचा खंड पडल्यास योग्य वेळी आंतरमशागतीची कामे केल्याने जमिनीतील ओलावा टिकून राहतो, तण नियंत्रण होते व पिकांची वाढ सुधारुन उत्पादनातील घट कमी करता येते. ओलावा टिकवून ठेवण्यासाठी उथळ कोळपणी करावी. यामुळे जमिनीच्या भेगा बुजतात आणि बाष्पीभवन कमी होते. यासाठी पेरणीनंतर ३०-३५ दिवसांनंतर जमिनीतील ओलावा दीर्घकाळ टिकून राहण्यासाठी डवऱ्याच्या जानकुळास दोरी गुंडाळून पिकाच्या प्रत्येक ओळींमध्ये सऱ्या काढाव्यात. यामध्ये पिकांच्या मुळांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. तण पिकापेक्षा जास्त वेगाने पाणी अन्नद्रव्ये शोषतात. त्यामुळे तणांची स्पर्धा पिकासाठी घातक ठरते. त्यामुळे वेळोवेळी तणांवर नियंत्रण मिळवावे.

जमिनीतील ओलावा टिकवण्यासाठी शेतात उपलब्ध सोयाबीन, गहू, ज्वारी, किंवा इतर पिकांच्या अवशेषांचा भुसा किंवा पेंढा जमिनीच्या ओळींमध्ये पसरवावा. पावसाच्या खंड काळात पिकाला संरक्षित सिंचन द्यावे. शेततळे, विहीर किंवा उपलब्ध जलस्त्रोत असल्यास संरक्षित सिंचन द्यावे. त्यामुळे पिकावरील ताण कमी होऊन वाढ पुन्हा सुरु होते. फवारणीच्या माध्यमातून पिकांना अन्नद्रव्ये द्यावीत. त्यामुळे पाण्याचा ताण सहन करण्याची शक्यताही वाढवावी. पोटॅशिअम नायट्रेट म्हणजे १३:००:४५ ची १ टक्के म्हणजे १० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. यामुळे पिकांच्या वाढीसाठी तसेच तणांच्या सहनशक्ती वाढीसाठी आणि उत्पादन सुधारण्यासाठी



प्रभावी उपाय आहे. विशेषत: एल निनो आणि कमी पावसाच्या परिस्थितीत ती अत्यंत उपयुक्त आहे. पावसाचा खंड पडल्यामुळे पिकांवर ओलाव्याचा ताण येतो, अशा अवस्थेत पिकांची प्रतिकारशक्ती कमी होते. त्यामुळे कीड रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते त्यामुळे शेतकऱ्यांनी नियमितपणे पिकांची पाहणी करुन एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा. शेतामध्ये फेरोमोन सापळे, पिवळे आणि निळे चिकट सापळे लावावे.

पिकानुसार नियोजन : सोयाबीन : सोयाबीनची उगवण कमी झाल्यास त्याची दुबार पेरणी करावी. उगवण झालेली असल्यास पिकाला त्याला संरक्षित सिंचन द्यावे. याशिवाय पाण्याचा ताण टाळण्यासाठी पिकावर २ टक्के पोटॅशिअम नायट्रेटची फवारणी करावी. याशिवाय आंतरमशागतीमध्ये खुरपणी आणि कोळपणी करावी. बाजरी : या पिकामध्ये उगवण कमी असल्यास दुबार पेरणी करावी. परंतु आता बाजरी ऐवजी सूर्यफूल किंवा हुलगा हे पीक घ्यावे. उगवण झालेल्या पिकात विरळणी, खुरपणी आणि कोळपणीसुद्धा आठवणीने करावी. कापूस, मका, हुलगा, मटकी : उगवण कमी झाल्यास दुबार पेरणी करावी. बाजरी किंवा राळा पीक घ्यावे आणि खुरपणी, कोळपणी करावी. सूर्यफूल, तूर, मूग, उडीद : या पिकांमध्ये दुबार पेरणी करावी. तसेच उगवण झालेल्या पिकामध्ये विरळणी, भरपेरणी, खुरपणी करावी. तसेच पेरणीच्या २१ दिवसांनी कोळपणी करावी.

## कोंबड्या कमी अंडी देण्याची कारणे आणि उपाय!

मुक्त कोंबडीपालन पद्धती मध्ये अंड्याचे किमान ४०% आणि कमाल ६५% उत्पादन मिळणे अपेक्षित आहे. म्हणजे १०० कोंबड्यामागे कमीत कमी ४० अंडी मिळायला हवीत तरच व्यावसायिक स्वरूपात हा धंदा परवडतो. परंतु काही कारणांमुळे बऱ्याचदा अंडी उत्पादन अपेक्षेप्रमाणे मिळत नाही. कमी प्रमाणात अंडी उत्पादन यामागील कारणे आणि त्यावर करायचे उपाय जाणून घेऊ या.

कोंबड्यांत कमी अंडी उत्पादनांचे कारणे : कोंबड्या या त्या त्या वयाच्या कळपामध्ये राहणे पसंत करतात. मोठ्या कोंबड्या लहान पिल्लांना चोच मारुन जखमी करतात किंवा पाठीवरील पिसे उपसतात. संघर्षामुळे कोंबड्यांच्या शरीरावर ताण येतो त्यामुळे अंडी उत्पादन कमी होते. म्हणून शक्यतो एकाच वयाच्या कोंबड्यांचा किंवा पिल्लांचा कळप असावा. वेगवेगळ्या वयाच्या कोंबड्यांना एकत्र मिसळू नये. पोल्ट्रीफार्म जवळ कुत्र्यांचे भुंकणे, मांजराचे ओरडणे, हिंस्र प्राण्यांचा वावर, वाहनांचा आवाज, गोठ्यात अनोळखी व्यक्तीचा प्रवेश यामुळे कोंबड्यांवर ताण येवून अंडी उत्पादनावर परिणाम होतो यासाठी पोल्ट्रीफार्म मुख्य रस्त्या पासून सुरक्षित दूर अंतरावर असावे, जेणेकरून आवाजाचा कमी त्रास होईल. विशेषतः अंड्यांवरील कोंबड्यांना त्रास होऊ नये याची विशेष काळजी घ्यावी. उन्हाळ्यात तापमान वाढीमुळे अंडी उत्पादन घटते. अशावेळी कोंबड्याना थंड पाण्याचा पुरवठा करावा, तसेच ताण कमी करण्याची औषधे द्यावीत, शेड मधे हवा खेळती ठेवावी. पक्षांना राहण्यासाठी अपुरी जागा असेल तर आजार लवकर पसरतात. प्रति पक्षी किमान ४ ते ५ वर्ग फुट जागा असावी. मुक्त पद्धत असेल तर रात्रीच्या निवाऱ्यासाठी किमान २ वर्ग फुट जागा प्रति पक्षी उपलब्ध करून द्यावी. लसिकरण करताना कोंबड्यांच्या शरीरावर ताण येतो आणि अंडी उत्पादन कमी होते. लस दिल्यानंतर



नेहमी कोंबड्याना ताण कमी करणारी औषधे आणि लिवर टॉनिक्स द्यावीत. आजार पसरल्यास अंडी उत्पादनावर वाईट परिणाम होतो. त्यामुळे वरचेवर कोंबड्याना जंत नाशक औषध द्यावीत, लीटर हे नेहमी स्वच्छ आणि कोरडे ठेवावे. त्यात १०% चुना मिक्स करावा. कोंबडी ही नेहमी अंधाऱ्या आणि एकांत असणाऱ्या सुरक्षित जागी अंडी देणे पसंत करते. त्या दृष्टीने प्रति ६ ते ८ पक्षी एक अंडी देण्याचे खोके/नेस्ट बॉक्स ठेवावे. अंडयावरील कोंबड्यांना सतत स्वच्छ, निर्जंतुक आणि मुबलक पाणी पिण्यास द्यावे. पाण्याची भांडी ही वारंवार स्वच्छ करावीत. शक्यतो पाणी स्वच्छ सुती कपड्याने गाळून घ्यावे. तसेच पाण्यात ई कोलाई किंवा सालमोनेला या आजारांच्या विषाणूंचा प्रादुर्भाव होऊ नये याची काळजी घ्यावी. कोंबड्यांना संतुलित आहार दिला नाही तर अंडी उत्पादनावर परिणाम होतो. अंडी उत्पादन सुरु होताच म्हणजे २० ते २२ आठवडे वय असताना कोंबड्याना उच्च प्रथिने (१६%) आणि ऊर्जा युक्त संतुलित आहार पुरवावा. मुक्त पद्धत असेल तर नैसर्गिक कीडे, मुंगी, गवत आणि इतर नैसर्गिक आहार यांच्या व्यतिरिक्त प्रति पक्षी किमान ८० ते ९० ग्रॅम संतुलित आहार द्यावा. कोंबड्यांना आहारातून योग्य खनिजांचा पुरवठा न झाल्यास कमी अंडी उत्पादन, कवच विरहित अंड, कमकुवत कवच असणारी व लगेच फुटणारी अंडी देणे या समस्या उद्भवतात. अंडी देणाऱ्या कोंबड्यांना संतुलित आहारा सोबत किमान ५% अतिरिक्त कॅल्शिअम द्यावे. बाजारात उपलब्ध असलेली खनिज मिश्रण/ कॅल्शिअम कार्बोनेटचा किंवा शिंपल्याचा चुरा तसेच पाण्यात मिसळलेला कळीचा चुना देखील कॅल्शिअमचा चांगला पर्याय आहे. कोंबड्याना उच्च अंडी उत्पादन देण्याच्या दृष्टीने योग्य प्रमाणात प्रकाश उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे. अंडयावर आलेल्या कोंबड्यांना दिवसातील किमान १६ तास सलग प्रकाश दिसायला हवा. यादृष्टीने दिवसा नैसर्गिक सूर्यप्रकाश किती तास असतो याचा अभ्यास करून कृत्रिम प्रकाश पुरवावा लागतो. म्हणजे १२ तास सूर्य प्रकाश असेल तर ४ तास कृत्रिम प्रकाश पुरवावा. त्या प्रकाशाची तीव्रता शेडमध्ये सहज वर्तमानपत्र वाचता येईल एवढीच असावी. पोल्ट्रीफार्म धारकांनी फार्म वर दिवसातून किमान ३ ते ४ वेळा अंडी गोळा करावीत. अंडी लवकर गोळा न केल्यास केव्हा तरी अपघाताने अंडे फुटते आणि कोंबड्याना अंडे खायची सवय लागते, ही विकृति वाढल्यास कोंबड्या स्वतः ची अंडी फोडून खायला सुरुवात करतात. साहजिकच अंडी उत्पादन घटते. अंडयावरील कोंबडी ही वजनाने हलकी असावी. अती वजन वाढल्यास अंडी उत्पादनावर वाईट परिणाम होतो. त्यादृष्टीने कोंबड्या अंडयावर येताना म्हणजे २० व्या आठवड्यात १२०० ते १३०० ग्रॅम वजन असावे. आणि सरासरी कोंबडीचे वजन १५०० ग्रॅम असावे. त्यापेक्षा जास्त वजन झाले तर अंडी उत्पादन कमी होऊ शकते. त्यामुळे कोंबड्यांच्या वजनाकडे आणि आहाराकडे बारीक़ लक्ष द्यावे. वयाच्या ७२ आठवड्यापर्यंत कोंबड्या उच्च अंडी उत्पादन देतात. त्यानंतर मात्र त्या मौल्टिंग अवस्थेत म्हणजेच अंगावरील पिसे गळून पडून त्याजागी नवीन पिसे येतात. यासाठी २ ते अडीच महीने जातात या काळात अंडी उत्पादन खूपच कमी होते. नर सतत माद्यांच्या मागे लागून कळपात ताण निर्माण करतात. साधारण १०० पिल्लांमधे किमान ३० ते ४० टक्के नर तयार होतात त्यामुळे अतिरिक्त नर योग्य वेळीच कमी करणे केव्हाही फायद्याचे असते. प्रति ८ ते १० मादी एक नर ठेवावा. खुडूक कोंबड्या अंडी देत नाहीत आणि नेस्ट बॉक्स मधील जागा मात्र अडवून ठेवतात. अशा कोंबड्याना अंडी उत्पादनासाठी प्रोत्साहित करावे किंवा त्यांचा वापर घरच्या घरी पिल्लू निर्मितिसाठी करावा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६२ : इंग्लंडमधे प्रतिष्ठित असलेल्या 'रॉयल सोसायटी'ची स्थापना
१६७४ : मुघल सरदार बहादुरशाह कोकलताश याच्या ताब्यात असलेल्या पेडगावची मराठ्यांनी लूट केली. सुमारे १ कोटिची लूट रायगडावर जमा झाली.
१९१६ : जगभरात विमान, रोटरक्राफ्ट, रॉकेट, उपग्रह, दूरसंचार उपकरणे आणि क्षेपणास्त्रांची रचना आणि विक्री करणारी अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनी बोईंग ची स्थापना करण्यात आली.
१९२६ : मुंबईत कुलाबा ते क्रॉफर्ड मार्केट अशी उपनगरी बस सेवा सुरू झाली.
१९२७ : समाजाला कुटुंबनियोजन आणि लैंगिक समस्यांसंबधी मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने र. धों. कर्वे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुरु केलेल्या 'समाजस्वास्थ्य' या मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९५५ : आण्विक अस्त्रांवर बंदी घालणाऱ्या मैनाउ जाहीरनाम्यावर १८ नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञांनी स्वाक्षऱ्या केल्या. नंतर आणखी ३८ नोबेल पारितोषिक विजेत्यांनी त्याला मान्यता दिली.
१९५५ : पंडित जवाहरलाल नेहरू यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर
१९६२ : शिक्षणक्षेत्रातील महत्त्वपूर्ण व यशस्वी प्रयोग मानल्या जाणार्या 'ज्ञानप्रबोधिनी' या संस्थेचा पुणे येथे प्रारंभ
१९७९ : भारताचे तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
१९९६ : स्वाध्याय परिवाराचे प्रणेते पांडुरंगशास्त्री आठवले यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर
१९९७ : पर्यावरणवादी कार्यकर्ते महेशचंद्र मेहता यांची रॅमन मॅगसेसे पुरस्कारासाठी निवड
२००६ : ट्विटर हा सर्वात मोठा सोशिअल प्लॅटफॉर्म सुरु झाला.
२०११ : भारतीय अंतराळ संस्था इस्रो ने आपल्या ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण वाहन पीएसएलव्हीद्वारे आधुनिक संप्रेषण उपग्रह जीसॅट-१२ अंतराळ कक्षेत यशस्वीरित्या स्थापित केला.
२०१४ : जागतिक युवा कौशल्य दिन

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६०६ : रेंब्राँ डच चित्रकार (मृत्यू: ४ आक्टोबर १६६९)
१६११ : मिर्झा राजे जयसिंग (मृत्यू: २८ ऑगस्ट १६६७)
१७८३ : पर्शियन भारतीय व्यापारी व दानवीर जमशेदजी जीजाभाई यांचा जन्मदिन.
१८४० : स्कॉटिश इतिहासकार, सांखिकीतज्ञ, संकलक आणि भारतीय नागरी सेवेचा सदस्य विलियम विलसन हन्टर यांचा जन्मदिन.
१९०३ : के. कामराज स्वातंत्र्यसैनिक, खासदार व तामिळनाडुचे मुख्यमंत्री (मृत्यू: २ आक्टोबर १९७५)
१९०४ : गानतपस्विनी मोगुबाई कुर्डीकर जयपूर अत्रौली घराण्याच्या शास्त्रीय गायिका (मृत्यू: १० फेब्रुवारी २००१)
१९०५ : चौधरी मुहम्मद अली पाकिस्तानचे ४ थे पंतप्रधान (मृत्यू: २ डिसेंबर १९८०)
१९०९ : भारतीय स्वतंत्रता सेनानी, मुत्सदी, वकील व आंध्रप्रदेश राज्याच्या पहिल्या महिला राजनेता दुर्गाबाई देशमुख यांचा जन्मदिन.
१९१७ : नूर मोहम्मद तराकी अफगणिस्तानचे तिसरे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १४ सप्टेंबर १९७९)
१९२७ : प्रा. शिवाजीराव भोसले विचारवंत, वक्ते व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (मृत्यू: २९ जून २०१०)
१९३० : नोबल पारितोषिक विजेता अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ लिओन एम. लेडर मैन यांचा जन्मदिन.
१९३२ : नरहर कुरुंदकर विद्वान, टीकाकार आणि लेखक (मृत्यू: १० फेब्रुवारी १९८२)
१९३३ : भारतीय लेखक आणि पटकथालेखक एम. टी. वासुदेवन नायर यांचा जन्म.
१९३६ : भारतीय हिंदी पत्रकारिता, लेखक आणि राजकीय विश्लेषक प्रभास जोशी यांचा जन्मदिन.
१९३७ : भारतीय पत्रकार श्री प्रभाज जोशी यांचा जन्म. (मृत्यू: ५ नोव्हेंबर २००९)
१९४९ : माधव कोंडविलकर दलित साहित्यिक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२९१ : रुडॉल्फ (पहिला) जर्मनीचा राजा (जन्म: १ मे १२१८)
१५४२ : लिओनार्डो दा विंची यांच्या पेंटिंग मोना लिसा मधील महिला लिसा डेल जिकॉन्डो यांचे निधन. (जन्म: १५ जून १४७९)
१९०४ : अंतॉन चेकॉव्ह रशियन कथाकार व नाटककार. याने मॉस्को विद्यापीठातून वैद्यकीय पदवी घेतली होती मात्र वैद्यकीय व्यवसाय कधी केला नाही. (जन्म: २९ जानेवारी १८६०)
१९१९ : एमिल फिशर रासायनिक प्रक्रियेद्वारे शर्करा रेणूंच्या निर्मितीसाठी १९०२ मध्ये नोबेल पुरस्कार मिळालेले जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ९ आक्टोबर १८५२)
१९५३ : ऑर्डर ऑफ दी इमिटेशन ऑफ क्राइस्ट चे संस्थापक भारतीय आर्चबिशप गिवरगीस मार इव्हानिओस यांचे निधन. (जन्म: २१ सप्टेंबर १८८२)
१९६७ : नारायण श्रीपाद राजहंस तथा 'बालगंधर्व' गायक व नट (जन्म: २६ जून १८८८)
१९७९ : मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष गुस्तावोदियाझ ओर्दाझ यांचे निधन.
१९९१ : जगन्नाथराव जोशी जनसंघ व भाजपचे नेते, गोवा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक, संसदपटू, वक्ते (जन्म: ? ? १९२०)
१९९८ : ताराचंद परमार गांधीवादी कार्यकर्ते व स्वातंत्र्यसैनिक
१९९९ : इंदुताई टिळक सामाजिक कार्यकर्त्या
१९९९ : जगदीश गोडबोले पर्यावरणवादी लेखक व सामाजिक कार्यकर्ते
२००४ : डॉ. बानू कोयाजी कुटुंबनियोजनाच्या क्षेत्रात सलग साठ वर्षे कार्य करणार्या सामाजिक कार्यकर्त्या. त्यांना पद्मभूषण, रॅमन मॅगसेसे पुरस्कार, रामेश्वरदास बिर्ला राष्ट्रीय पुरस्कार, पुण्यभूषण पुरस्कार, पुणे विद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ लेटर्स (१९५५) इ. पुरस्कारांनी गौरविण्यात आले. पुण्यातील के. इ. एम. रुग्णालय, जहांगीर नर्सिंग होम, दैनिक सकाळ, इंडिया फांउंडेशन इ.संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. (जन्म: २२ ऑगस्ट १९१८)

# शासनाचा उद्यम आधार प्रमाणपत्र व्यापाऱ्यांना आर्थिक बळ देणार-हस्तीमल बंब

## १३८ व्यापाऱ्यांना उद्यम आधार प्रमाण पत्र प्रदान

जालना। प्रतिनिधी

देशातील सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग व्यवसाईकाना सक्षम करण्याच्या उद्देशाने भारत सरकार उद्योग मंत्रालय तर्फे उद्यम नोंदणी व्यवस्था सुरु केलेली आहे. या नोंदणी नंतर व्यापाऱ्यांना प्रमाणपत्र प्रदान केले जाते. या मुळे आपल्या उद्योगाला शासन मान्य ओळख मिळते. शासनाचा उद्यम आधार प्रमाणपत्र लहान-सहान व्यापाऱ्यांना आर्थिक बळ देणार असे उद्गार मराठवाडा विभागीय अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांनी शिबिरात मार्गदर्शन करताना काढले. व्यापारी महासंघ व जनरल मर्चन्टस असोसिएशन जिल्हा जालनाच्या वतीने दि. १२ जुलाई २०२६ रविवार रोजी एक दिवसीय उद्यम आधार प्रमाणपत्र शिबीराचे आयोजन जैन भवन, सकलेचा नगर, जालना येथे करण्यात आले होते. पुढे बोलतांना बंब म्हणाले सध्या शासकीय किंवा खासगी नौकरी मिळणे फार अवघड आहे, त्यामुळे गरंजमद महिला, तरुण हे उद्योग व्यवसायात वळत आहे. राष्ट्रीय अंतर राष्ट्रीय मोठ मोठे मॉल, ऑनलाईन व्यवसाय मुळे स्पर्धेच्या युगात व्यवसायात



टिकणे गंभीर समस्या आहे. सर्व क्षेत्रात महिलांची कामगिरी उत्कृष्ठ ओह. उद्योग व्यवसायात सुध्दा महिला पुढे येत आहे.

अनेक प्रकारचे गृह-उद्योग पिठाची गिरणी, विशेष करून ग्रामीण भागात आपल्या कुटुंबाच्या उदर निर्वाह करण्यासाठी करावा लागत आहे. शासनाची अनेक योजना, अनुदान नाममात्र व्याजाने कर्ज देण्यात येते. हे सर्व योजना प्राप्तीसाठी सर्वात प्रथम उद्यम आधार नोंदणी करुण प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. अश्या प्रकारचे शिबीर जिल्हयात सर्व तालुक्यात व मराठवाड्याचे सर्व जिल्ह्यात राबू असे बंब म्हणाले. राज्य उपाध्यक्ष सतीष पंच मार्गदर्शन करतांना हे शिबीर प्रथमच आयेजित करण्यात आले आहे, याला भरपुर प्रतिसाद सुध्दा मिळालेला आहे. आजच्या घडीला उद्यम आधार प्रमाणपत्र अति महत्वाचे आहे. व्यवसायात प्रगतीची पहिली पायरी उद्यम आधार आहे, असे पंच म्हणाले. महिला आघाडीची सौ. सिता मोहिते यांनी आपले विचार मांडताना शिबीरात महिला सुध्दा मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्या बद्दल कौतुक करुन धन्यवाद दिले. शिबीरात १३८ गरजमंद महिला-पुरुष व्यापाऱ्यांना उद्यम आधार प्रमाणपत्र काढून त्यांना प्रदान करण्यात आले. या शिबीरासाठी सुखदेव बजाज, अंकुश राऊत, संदीप काबरा, राम मोहिते, अॅड. सुब्रह्मण्यम अय्यर, प्रमोद जोशी महिला आघाडीची सौ. आनंदी अय्यर, सौ. प्रिया जोशी इ. परिश्रम घेतले. शासन मान्य प्रतिनिधी समाधान खरात व त्यांचे सहकारी यांनी सर्व टेक्नॉलाजी (काम्प्युटर, लेपटॉप इ.) लगाणारे साहित्य सह संपुर्ण दिवस आपली सेवा देऊन त्वरीत प्रमाणपत्राची प्रिन्ट काढून दिले. अपुर्ण कागद-पत्र असलेल्यांची नोंदणी करण्यात आली असून त्यांना सुध्दा लवकरच प्रमाणपत्र देण्यात येईल. कार्यक्रमाचे सुत्र संचालन गोविंद साखला यांनी तर आभार सचिव प्रविण मोहता यांनी मांडले. शिबिरात मोठ्या संख्येने महिला-पुरुष व्यापारी उपस्थित होते.

# विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्रीवर बाजार समितीची नजर

## जामखेडमध्ये विशेष सर्वेक्षण सुरू

जामखेड । प्रतिनिधी

जामखेड तालुक्यात विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्री करणाऱ्या व्यापारी, संस्था आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांविरुद्ध कृषी उत्पन्न बाजार समितीने धडक मोहीम हाती घेतली आहे. संचालक मंडळाच्या बैठकीत हा विषय गांभीर्याने चर्चेला आल्यानंतर तालुकाभर विशेष सर्वेक्षण सुरू करण्यात आले असून, नियमबाह्य व्यवहार करणाऱ्यांची माहिती संकलित केली जात आहे. बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांकडून विविध व्यापारी, संस्था आणि एफपीओ यांच्याकडे प्रत्यक्ष भेटी देऊन परवाना, व्यवहाराचे स्वरूप तसेच शेतमाल खरेदी-विक्रीची माहिती गोळा केली जात आहे. आवश्यक परवाना न घेता शेतमालाची खरेदी-विक्री करणाऱ्यांवर प्रचलित कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे बाजार समिती प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ तसेच नियम, १९६७ नुसार शेतमाल व्यापाराचे नियमन करण्यात आले आहे. तसेच शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार थेट पणन, खासगी बाजार, शेतकरी-ग्राहक बाजार, ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्म आदी माध्यमांतून व्यापार करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडून वैध परवाना घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या शेतमालाची विक्री केवळ परवानाधारक व्यापाऱ्यांनाच करावी, असे आवाहन बाजार समितीने केले आहे. परवानाधारक व्यापाऱ्यांकडे व्यवहाराची अधिकृत नोंद उपलब्ध असल्याने पैसे अडकणे, फसवणूक होणे किंवा इतर कोणताही वाद निर्माण झाल्यास संबंधित व्यापाऱ्यावर कायदेशीर कारवाई करणे शक्य होते. त्यामुळे व्यवहार करण्यापूर्वी व्यापाऱ्याचा परवाना तपासूनच शेतमाल विक्री करावी,

-श्री.शरद कार्ले, सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती जामखेड

कोणत्याही व्यापारी, संस्था किंवा शेतकरी उत्पादक कंपनीने आवश्यक परवाना घेतल्याशिवाय शेतमाल खरेदी-विक्रीचा व्यवसाय करू नये. बाजार समितीकडून तालुक्यात विशेष सर्वेक्षण सुरू असून, नियमबाह्य व्यवहार आढळल्यास संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. शेतकऱ्यांनीही केवळ परवानाधारक व्यापाऱ्यांशीच व्यवहार करून स्वतःच्या हिताचे संरक्षण करावे.

-दिलीप तिजोरे, सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, जामखेड तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जामखेड

# अन्न औषध पथकाच्या खरवंडी येथील लोकसेवा व पूर्णब्रह्म हॉटेलवर धाडी

## एफडीए सहाय्यक आयुक्त अपर्णा भोईटे करप्टेड अधिकारी, कारवाईचा अहवाल देण्यास टाळाटाळ!

पाथर्डी। प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यात खरवंडी कासार येथे मंगळवारी सकाळी अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या पथकाने टोलनाक्या जवळील हॉटेल लोकसेवा राष्ट्रीय महामार्ग ६१ लगत असलेल्या हॉटेल पूर्णब्रह्म या हॉटेलवर धाडी टाकल्या परंतु या धाडीमध्ये अन्न औषध प्रशासन अहिल्यानगर सहाय्यक आयुक्त अपर्णा भोईटे आणि त्यांच्या पथकाने काय कारवाई केली याचा अहवाल देण्यास स्पष्ट टाळाटाळ केली आहे.

पत्रकारांनी फोन केल्यानंतर अपर्णा भोईटे यांनी कुठल्याही पद्धतीने उत्तर दिले नाही यामुळे अपर्णा भोईटे यांनी किमान दोन ते तीन लाख रुपये घेऊन कारवाईच्या नावाखाली हॉटेलवाल्यांना अन्न व औषध भेसळ पथकाच्या कारवाईच्या नावाखाली धमकावल्याचा आणि त्यांच्याकडून रिश्वतखोरी केल्याचा संशय बळावला आहे यासंदर्भात महाराष्ट्र राज्य अन्न औषध प्रशासनाचे जॉईंट कमिशनर संतोष कांबळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सहाय्यक आयुक्त अपर्णा भोईटे यांची लेखी तक्रार देण्यास सांगून तातडीने खरवंडी कासार येथील हॉटेल लोकसेवा व हॉटेल पूर्णब्रह्म या ठिकाणी अन्न औषध प्रशासनाने केलेल्या कारवाईचा अहवाल मागवला आहे अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोशी असलेल्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याचे आश्वासन जॉईंट कमिशनर संतोष कांबळे यांनी दिले आहे.

### अपर्णा भोईटे यांना तातडीने सस्पेंड करा -किसन आव्हाड

अहिल्यानगर येथील अन्य औषध प्रशासनाच्या सहाय्यक आयुक्त अपर्णा भोईटे यांनी एफडीए विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी महाराष्ट्रभर चालवलेल्या धडाकेबाज कारवायांच्या गैरफायदा घेत अहिल्यानगर जिल्ह्यात दूध डेरी किराणा स्टोअर्स गुटखा माफिया मावा माफिया परमिट रूम बियर बार इत्यादी आस्थापना असलेल्या संस्थेवर एफडीए पथकाच्या धाडी टाकून कारवाई करण्याच्या नावाखाली करोडो रुपये कमावत असल्याचा व प्रत्येकी तालुक्याच्या दूध डेऱ्या किराणा स्टोअर गुटखा मावा बनावट खवा केक आणि अन्य आस्थापना व्यापाऱ्यांकडून लाखो रुपयांचा हप्तेखोरी करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते किसन आव्हाड यांनी केला आहे यासंदर्भात जॉईंट कमिशनर संतोष कांबळे यांच्याकडे लेखी तक्रार देऊन सहाय्यक आयुक्त अपर्णा भोईटे यांच्या निलंबनाची मागणी करण्यात आली आहे.

### खरवंडी कासार मंगळवारी दिवसभर झाले शटडाऊन !

मंगळवारी सकाळनंतर अण्ण औषध प्रशासन तथा केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशन पथक यांच्या अचानक पडलेल्या धाडींमुळे खरवंडी कासार येथील बाजारपेठ किराणा स्टोअर्स मेडिकल स्टोअर्स हॉटेल्स मावा गुटखा विक्री करणाऱ्या टपऱ्या पूर्णपणे शटडाऊन असल्याने बाजारपेठ पूर्णपणे ठप्प असल्याचे चित्र पाहायला मिळाले याचाच अर्थ किरणा स्टोअर्स हॉटेल्स मध्ये दारूपेक्षाही जास्त भयानक भेसळ केली जात आहे हे आता निष्पन्न होत आहे ज्यामध्ये बनावट पाम तेल बनावट खाद्यपदार्थ बनावट पनीर बटर दूध इत्यादी केमिकलयुक्त पदार्थ असल्याने नागरिकांच्या आरोग्याशी धोका केला जात असल्याने तातडीने भेसळ करणाऱ्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

# हिंगोलीत झटका मशीन लावण्यावरून राडा

## दोन गट आपापसात भिडले, जिवे मारण्याची धमकी, १४ जणांवर गुन्हा दाखल

हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली तालुक्यातील सवड शिवारात शेताच्या धुऱ्यावर झटका मशीन लावण्याच्या कारणावरून जिवे मारण्याची धमकी व हाणामारी झाल्याची घटना घडली आहे.

या प्रकरणी परस्पर तक्रारीवरून १४ जणांवर नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात सोमवारी ता. १३ गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सवड शिवारात गौतम जावळे व ईश्वर जावळे यांचे शेत आहे. या भागात वन्य प्राणी मोठ्या प्रमाणावर असून कळपाने राहणारे प्राणी शेतात पिकांची नासाडी करीत आहेत. सध्या शेतात सोयाबीन व इतर कोवळी पिके असून या पिकांचे वन्य प्राण्यांमुळे नुकसान होत आहे. त्यामुळे गौतम जावळे यांनी धुऱ्यावर झटका मशीन लावली होती त्या मशीनचा तार सर्व शेताच्या बाजूने लावला जात होता.

यावेळी तार लावण्याच्या कारणावरून गौतम व ईश्वर यांच्यात वाद सुरु झाला. झटका मशीनचा तार आमच्या धुऱ्याकडून का लावतो या कारणावरून शाब्दीक चकमकीने सुरु झालेला वाद जिवे मारण्याच्या धमक्या पर्यंत पोहोचला. दोन्ही कडील मंडळी हातात काठ्या, कत्ती घेऊन उभे होते.

यामध्ये जिवे मारण्याच्या धमक्याही देण्यात आल्या. याप्रकरणी गौतम जावळे यांच्या तक्रारीवरून ईश्वर जावळे, निखील जावळे, दामोदर जावळे, सिध्दार्थ जावळे, सचिन जावळे, नामदेव जावळे यांच्यासह अन्य तिघांवर नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणात ईश्वर जावळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गौतम जावळे, दिनेश जावळे, सुधाकर जावळे यांच्यासह अन्य दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक अशोक घारगे, जमादार एस. एन. खांडेकर, खंडेराव नरोटे, एम. वाय. काळे पुढील तपास करीत आहोत.

# कलेक्शन किंग एजंट विनोद सारखा भाऊचोर मासा डिस्ट्रॉय करणार का?

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी पोलीस ठाण्यातील हप्ते खोरीचे चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष एजंट विनोद व खरवंडी कासार पोलीस चौकीतील नव्याने नियुक्त केलेला भाऊचोर पोलीस कर्मचारी हे लाखो रुपयांची रिश्वतखोरी करत आहेत या दोघांनाही तातडीने पाथर्डी पोलीस ठाण्यातून सस्पेंड करण्याची मागणी पोलिस अधीक्षक ममुका सुदर्शन व गृहमंत्रालय मुंबई यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे खरवंडी कासार पोलीस चौकीत भाऊचोर पोलीस स्वतः लिंगपिसाट असून काही महिन्यांपूर्वी मोहटादेवी गडाच्या पायथ्याशी असणारे एका गावातील पीडित महिलेचे त्याने लाखो रुपये देऊन तोंड बंद केले आहे म्हणून प्रकरण दाबले गेले खरवंडी कासार पोलीस चौकीच्या जेडूसिएल अंतर्गत चालणारे अवैध धंदे मटके बनावट दारू गांजा अवैध वाळू तस्कर गुटखा माफिया या सगळ्या माफियांच्या मुकुट कवच रक्षक करणारा पोलीस कर्मचारी सर्वात मोठा रीशवतखोर असून तो खरवंडी कासार पोलीस चौकीत नव्याने नियुक्त केला असला तरी त्याने खरवंडी पोलीस चौकी येथे बदली करण्यासाठी लाखो रुपये मावेजा साहेबांना दिल्याची माहिती आहे यावरून साहेब आपण एजंट विनोद व भाऊचोर मासा यांचे आका तर नाही ना असा संशय बळावला आहे आमदार मोनिका राजळे यांनी संबंधित एजंट विनोद व भाऊचोर मासा यांच्या तक्रारीची दखल घेतल्याचीही माहिती आहे संबंधित पोलीस कर्मचारी कागदोपत्री ड्युटी करत असून प्रत्यक्षात तो कधीही ड्युटीला हजर राहत नाही फक्त महिन्यासाठी अवैध धंदे करणारे गुंड माफिया यांच्याकडून लाखो रुपयांचे हप्ते जमा करून स्वतःची करोडो रुपयांची माया जमवत आहे संबंधित पोलीस कर्मचारी खरवंडी कासार येथील कुठल्या कुठल्या गुंड माफिया व अवैध धंदे करणारे यांच्याकडून हप्तेखोरी घेतो त्याचे संबंधित सर्व पुरावे आहेत.

# संभाजीनगर मनपा मुख्यालयासमोर दिव्यांगांचे ठिय्या आंदोलन

## अनियमित मानधनामुळे संतप्त, महापौरांच्या गाडीचा रस्ता अडवला

छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मुख्यालयासमोर आज दिव्यांग बांधवांनी ठिय्या आंदोलन केले. त्यांना गेल्या काही काळापासून नियमितपणे मानधन मिळत नसल्याने ते संतप्त झाले होते. आपल्या हक्काच्या मानधनासाठी त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. आंदोलकांनी महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारावर धरणे आंदोलन करत रस्ता पूर्णपणे रोखून धरला. तसेच, त्यांनी महापौरांच्या गाडीचा रस्ता अडवत प्रशासनाकडे आपल्या मागण्या मांडल्या. यावेळी प्रशासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली, ज्यामुळे मनपा प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली.

मुख्य प्रवेशद्वार आणि रस्ता अडवल्यामुळे महानगरपालिकेत दैनंदिन कामांसाठी आलेल्या सामान्य नागरिक आणि कर्मचाऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. अनेक नागरिकांना बाहेरच ताटकळत उभे राहावे लागले, ज्यामुळे प्रवेशद्वारावर मोठी कोंडी झाली होती. आंदोलक दिव्यांग बांधवांनी सांगितले की, हे मानधन त्यांच्या जगण्याचा मुख्य आधार आहे आणि ते वेळेवर न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यांनी थकीत मानधन त्वरित जमा करण्याची आणि यापुढे ते दरमहा नियमितपणे देण्याची मागणी केली. प्रशासनाने यावर तातडीने तोडगा न काढल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# ठाकरे गटाचे पदाधिकारी पोलिसांच्या ताब्यात

## खासदार वाकचौर विरोधातील ऑपरेशन तुडवा आंदोलन पोलिसांनी हाणून पाडले

अहिल्यानगर। प्रतिनिधी

शिर्डी मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या विरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने पुकारलेल्या 'ऑपरेशन तुडवा' आंदोलनावर तोफखाना पोलिसांनी सोमवारी प्रतिबंधात्मक कारवाई केली. खासदार वाकचौरे यांच्या दौऱ्यावेळी प्रत्यक्ष आंदोलन सुरू होण्यापूर्वीच पोलिसांनी ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.

सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात दिशा समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीसाठी खासदार वाकचौरे उपस्थित राहणार होते. ठाकरे गटातून शिंदे गटात प्रवेश केलेल्या वाकचौरे



यांच्यावर रोष व्यक्त करण्यासाठी ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आधीच ठाण मांडले होते. वाकचौरे यांच्या आगमनावेळी त्यांच्या विरोधात तीव्र निदर्शने करत 'ऑपरेशन तुडवा' आंदोलन करण्याची या कार्यकर्त्यांची तयारी होती. मात्र, या नियोजित आंदोलनाची माहिती मिळताच तोफखाना पोलिसांनी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर मोठा फौजफाटा तैनात केला होता. खासदार वाकचौरे हे बैठकीसाठी पोहोचण्यापूर्वीच आणि कार्यकर्त्यांनी आंदोलनाला प्रत्यक्ष सुरुवात करण्याआधीच पोलिसांनी कारवाई केली. ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख जाधव यांच्यासह तेथे उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या सर्वांना नंतर तोफखाना पोलिस ठाण्यात नेऊन स्थानबद्ध करण्यात आले. दरम्यान, ठाकरे गटाकडून वाकचौरे यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

# हिंगोलीत अवैध गौण खनिज वाहतुकीवर मोठी कारवाई

## २२ लाखांचा मुद्देमाल जप्त, ४ जणांवर गुन्हे दाखल

हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली जिल्ह्यात अवैध गौण खनिज वाहतुकीविरुद्ध पोलिसांनी दोन ठिकाणी मोठी कारवाई केली आहे. हट्टा आणि औंढा नागनाथ पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या या कारवाईत अवैध मुरूम आणि वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनांसह एकूण २२.१७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी चौघांवर मंगळवारी ता. १४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, औंढा नागनाथ येथील एका पेट्रोलपंपासमोर टिप्पर मधून अवैध वाळू वाहतूक केली जात असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यावरून पोलिस निरीक्षक मोहन भोसले, उपनिरीक्षक दिलीप मोरे, जमादार भुजंग कोकरे, नितीन गोरे, साईनाथ कंठे, इंगोले, यांच्या पथकाने मंगळवारी ता. १४ पहाटेच्या सुमारास वाहनांची तपासणी केली. यामध्ये एका टिप्परची तपासणी केली असता त्यात वाळू



आढळून आली. पोलिसांनी टिप्पर व वाळू असा १४.१५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी जमादार कोकरे यांच्या तक्रारीवरून टिप्पर चालक अंबादास राम राठोड (रा. शिरकुटी ता. जि. वाशिम) टिप्पर मालक अक्षय भुसांडे (रा. हिंगोली) यांच्या विरुध्द औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस उपनिरीक्षक अमोल इंगोले पुढील तपास करीत आहेत. या सोबतच अवैध गौणखनीज उत्खनन व वाहतुकीच्या अन्य एका घटनेमध्ये वसमत तालुक्यातील बाराशिव ते करंजाळा मार्गावर तलाठी गजानन शिंदे यांच्या पथकाने वाहनांची तपासणी केली. यामध्ये एका ट्रॅक्टरमधून अवैधरित्या मुरूम वाहतूक केला जात असल्याचे स्पष्ट झाले. त्यावरून ट्रॅक्टर व मुरुम असा ८.०२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी तलाठी शिंदे यांच्या तक्रारीवरून हट्टा पोलिस ठाण्यात चालक राजू कदम, अर्जुन कदम यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. उपनिरीक्षक शेख पुढील तपास करीत आहेत.

# माहिती दडवणे पडले महागात!

## आष्टीत जलजीवन योजनेची माहिती लपवणाऱ्या अधिकाऱ्याला २५ हजारांचा दंड

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी मतदारसंघातील बहुचर्चित जलजीवन योजनेची माहिती दडवणे बीड जिल्हा परिषदेच्या एका तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्याच्या चांगलेच अंगलट आले आहे. माहिती अधिकार अधिनियमाची (२००५) उघडपणे पायमल्ली केल्याप्रकरणी राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने या अधिकाऱ्याला तब्बल २५ हजार रुपयांचा दणका दिला आहे. कैलास दरेकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे प्रशासनात मोठी खळबळ उडाली असून, माहिती दडवून बसणाऱ्या अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

### कैलास दरेकरांच्या पाठपुराव्याला यश; बीड झेडपी प्रशासनात खळबळ

आष्टी मतदारसंघातील जलजीवन मिशनच्या कामांमध्ये पारदर्शकता यावी, या उद्देशाने कैलास दरेकर यांनी २४ मे २०२५ रोजी माहिती अधिकारांतर्गत अर्ज दाखल करून सविस्तर माहिती मागवली होती. मात्र, बीड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्याने या अर्जाला केराची टोपली दाखवली. कायद्यानुसार मुदतीत माहिती देणे बंधनकारक असतानाही, या अधिकाऱ्याने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. केवळ माहितीच लपवली नाही, तर वस्तुस्थितीही दडवून ठेवत कायद्याप्रति पूर्णपणे नकारात्मक दृष्टिकोन दाखवला.

अधिकाऱ्याच्या या मनमानी व बेजबाबदार कारभाराविरुद्ध कैलास दरेकर यांनी थेट राज्य माहिती आयोगाचे दरवाजे ठोठावले. आयोगासमोर कागदपत्रे आणि पुरावे सादर झाल्यानंतर अधिकाऱ्याचा भोंगळ कारभार उघड झाला. राज्य माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर यांनी या प्रकरणाची अत्यंत गंभीर दखल घेतली. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) चा थेट भंग झाल्याचा स्पष्ट निष्कर्ष आयोगाने नोंदवला.

याप्रकरणी कलम २०(१) नुसार संबंधित जन माहिती अधिकारी कारवाईस पात्र ठरल्याने, कलम १९(८)(क) मधील अधिकारांचा वापर करून राज्य माहिती आयुक्तांनी तत्कालीन अधिकाऱ्यावर २५,००० रुपये (अक्षरी पंचवीस हजार रुपये) इतकी अंतिम शास्ती (दंड) निश्चित केली. ही दंडाची रक्कम '००७०-इतर प्रशासकीय सेवा' या लेखाशीर्षांतर्गत जमा करण्याचे सक्त आदेश देण्यात आले आहेत. दंडात्मक कारवाईपुरतेच न थांबता, वर्तमान जन माहिती अधिकाऱ्याने कैलास दरेकर यांना त्वरित माहिती उपलब्ध करून द्यावी, असे पूर्वीचे निर्देश आयोगाने कायम ठेवले आहेत. तसेच, या महत्त्वपूर्ण आदेशाची प्रत आवश्यक त्या कठोर कार्यवाहीसाठी बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठवण्यात आली आहे. या सडेतोड निर्णयामुळे सर्वसामान्यांची अडवणूक करणाऱ्या आणि माहितीच्या अधिकाराची थट्टा उडवणाऱ्या मुजोर अधिकाऱ्यांना मोठी चपराक बसली आहे.



# अन्यायकारक टोल वसूली विरुद्ध क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे पाऊण तास चक्का जाम आंदोलन

केज । प्रतिनिधी

केज - मांजरसुंभा महामार्गावरील उमरी टोल नाक्यावर स्थानिक चारचाकी वाहनांना टोलमुक्ती देण्याच्या प्रमुख मागणीसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांच्या नेतृत्वाखाली दि.१४ जुलै वार मंगळवारी सकाळी ११:३० वाजता स्थानिक वाहनधारकांना व शेतकऱ्यांना घेऊन उमरी टोलनाका येथे चक्का पाऊन तास चक्का जाम आंदोलन करण्यात आले. यावेळी टोल कंपनीच्या विरोधात तीव्र घोषणाबाजी करुन टोल नाक्याच्या २० कि.मी. क्षेत्रातील स्थानिक चार चाकी वाहनांना व शेतकऱ्यांच्या शेतमाल वाहतूक करणाऱ्या वाहनांना संपूर्णपणे टोल माफी देण्याची मागणी जोरदारपणे करण्यात आली कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत आंदोलकांनी आक्रमकपणे चर्चा करत येत्या ८ दिवसात ◀◀ पान ३ वर

# प्लॉटिंग व्यवहारातून फसवणूक, खरेदी-विक्री संघाच्या माजी अध्यक्षासह दोन मुला विरोधात गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

प्लॉटिंगच्या व्यवहारात गुंतवलेली रक्कम व व्यवहारातील नफ्याचा हिस्सा परत न देता विश्वासघात केल्याचा तसेच शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करत माजलगाव शहर पोलीस ठाण्यात माजी खरेदी-विक्री संघाच्या माजी अध्यक्षासह दोन मुला विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, माजलगाव शहर पोलीस ठाणे गुन्हा क्र.२३७/२०२६ मध्ये भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (१)(२), ३५२, ३५१(१) (२) व

३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.या प्रकरणातील फिर्यादी नवनाथ गणपत



पवार (वय ४२,व्यवसाय शेती व व्यापार,रा. वारोळा तांडा,ता. माजलगाव,जि. बीड ) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, प्लॉटिंगच्या व्यवहारासाठी आरोपींना मोठी रक्कम देण्यात आली होती.तसेच व्यवहारातून मिळणाऱ्या नफ्यातील हिस्सा देण्याचे आश्वासनही देण्यात आले होते. मात्र,व्यवहारानंतर ना मूळ रक्कम परत करण्यात आली, ना नफ्याचा हिस्सा देण्यात आला. ही रक्कम उभी करण्यासाठी त्यांनी कर्ज काढले होते. तरीही आरोपींनी विश्वासघात करून आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या प्रकरणी दिपक जगन्नाथ जाधव, सौरभ दिपक जाधव व अभिषेक जाधव (सर्व रा. बँक कॉलनी, माजलगांव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, दि. १० जुलै २०२६रोजी सकाळी सुमारे १०.०० वाजता बँक कॉलनी, माजलगाव येथे आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या तक्रारीवरून दि. १३ जुलै २०२६ रोजी माजलगांव शहर पोलीस ठाण्यात संबंधित गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रकरणाचा पुढील तपास पोलीस

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला तालुका क्रीडा संकुल उभारणीचा आढावा

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील खेळाडूंच्या कौशल्याला वाव मिळण्यासाठी त्यांना चांगल्या दर्जाच्या क्रीडा सुविधा मिळणे अत्यंत गरजेचे आहे, तरी जिल्ह्यातील प्रलंबित तालुका क्रीडा संकुलांच्या उभारणीसाठी आवश्यक असणाऱ्या जागेबाबतच्या कामांच्या प्रक्रीयेला समन्वयातून गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीस जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर





यांच्यासह जिल्ह्यातील सर्व तालुका क्रीडा अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते. तर संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदार ऑनलाईन पद्धतीने सहभागी झाले होते. बैठकीत परळी, शिरुर, आष्टी, पाटोदा, धारुर आणि वडवणी येथील क्रीडा संकुलांच्या जागेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.


जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पाटोदा, आष्टी व शिरुर या तालुक्यांच्या ठिकाणी क्रीडा संकुलासाठी पर्यायी जागा उपलब्ध आहे का, याची चाचपणी केली. या ठिकाणी नवीन गायरान जमिनीचा शोध घेऊन त्याबाबतचा प्रस्ताव पुढील १५ दिवसांत सादर करण्याचे कडक निर्देश त्यांनी संबंधित तहसीलदार व उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच धारुर आणि वडवणी येथील क्रीडा संकुलाच्या जागेबाबत उद्भवलेल्या तांत्रिक अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य त्या सूचना केल्या. परळी येथील तालुका क्रीडा संकुलासाठी महानिर्मितीच्या अर्थात परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या ताब्यातील जमीन उपलब्ध करून देण्याबाबत पाठपुरावा करण्याचे व त्यासंबंधीची प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.


# तुकाराम मुंढेंना साखर आयुक्त करा; मग कारखानदारांचे गोड हिशेब बाहेर येईल

## प्रकाश सोळंके यांच्या मागणीवर भाई गंगाभीषण थावरे यांचा टोला

माजलगाव । प्रतिनिधी

अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडे साखर आयुक्तपदाचा अतिरिक्त कार्यभार द्यावा. त्यामुळे साखर कारखानदारांकडून शेतकऱ्यांची होत असलेली पिळवणूक आणि आर्थिक व्यवहारांची वस्तुस्थिती समोर येईल, अशी मागणी शेतकरी नेते भाई गंगाभीषण थावरे यांनी केली आहे. तसेच आमदार प्रकाश





सोळंके यांनी मुंढे यांची सध्याच्या पदावर कायम नियुक्ती करण्याची केलेली मागणी ही कारखानदारांच्या हिताची असल्याचा टोला त्यांनी लगावला.

थावरे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तुकाराम मुंढे हे अधिकारी होण्यापूर्वी शेतकरी पुत्र आहेत. त्यामुळे आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचा मान त्यांना द्यावा, अशी मागणी होत आहे. ◀◀ पान ३ वर

# युसूफवडगांव परिसरातील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे गडद संकट

## दीड महिना उलटला, तरी समाधानकारक पाऊस नाही; उधारीवर केलेली पेरणी धोक्यात, शेतकरी हवालदिल

युसूफवडगांव । प्रतिनिधी

खरीप हंगामाची स्वप्ने डोळ्यांत साठवून शेतात उतरलेल्या युसूफवडगांव परिसरातील शेतकऱ्यांवर आता दुबार पेरणीचे संकट गडद होऊ लागले आहे. मान्सूनला सुरुवात होऊन तब्बल दीड महिना उलटला, तरी परिसरात समाधानकारक पाऊस झालेला नाही. सुरुवातीला झालेल्या एक-दोन दमदार सरींनंतर पावसाने पूर्णपणे पाठ फिरवल्याने शेतातील उगवलेली पिके करपण्याच्या मार्गावर असून, शेतकऱ्यांच्या चिंतेत दिवसेंदिवस भर पडत आहे.

सुरुवातीच्या पावसानंतर आणखी जोरदार पाऊस होईल, या आशेवर अनेक शेतकऱ्यांनी पेरणी थांबवून ठेवली होती. मात्र, अपेक्षेप्रमाणे पाऊस न आल्याने मातीतील ओल पाहून शेतकऱ्यांनी उधारीवर बियाणे, खते आणि औषधे घेऊन पेरणी केली. पेरणीनंतर काही दिवस पिकांनी उभारी घेतली; परंतु गेल्या सहा-सात दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी पिके सुकण्यास सुरुवात झाली आहे. येत्या पाच-सहा दिवसांत दमदार पाऊस झाला नाही, तर दुबार पेरणी अटळ असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

यंदाच्या हंगामासाठी अनेक शेतकऱ्यांनी सावकार, पतसंस्था आणि नातेवाईकांकडून पैसे उधार घेतले. काहींनी अजूनही ट्रॅक्टरची मशागत, बियाणे आणि खतांची बिले चुकती केलेली नाहीत. अशा परिस्थितीत पुन्हा नव्याने बियाणे, खते आणि मशागतीचा खर्च उचलणे अनेकांच्या आवाक्याबाहेर आहे. त्यामुळे पहिली पेरणीच कर्जात झाली, आता दुबार पेरणीचे पैसे कुठून आणायचे? असा हताश सवाल शेतकरी विचारत आहेत. दरम्यान, हवामान विभागाकडून यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला जात असल्याने शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे. काही हवामान अभ्यासकांनी १६ जुलैनंतर चांगल्या पावसाची शक्यता वर्तविली असली, तरी तोपर्यंत पिके तग धरतील का, याबाबत शेतकऱ्यांच्या मनात साशंकता आहे. रोज आकाशाकडे नजर लावून बसण्याची वेळ त्यांच्यावर आली असून, प्रत्येक ढगाकडे आशेने पाहणारा बळीराजा पुन्हा निराश होत आहे. युसूफवडगांव परिसरातील बहुतांश शेती ही पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे वेळेत पाऊस झाला नाही, तर केवळ दुबार पेरणीच नव्हे तर संपूर्ण खरीप हंगाम धोक्यात येण्याची शक्यता आहे. शासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने कृषी विभागामार्फत पाहणी करावी, दुबार पेरणीसाठी बियाणे व आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी परिसरातून जोर धरू लागली आहे.

आभाळाकडे डोळे... मनात चिंतेचे ढग आणि शेतात करपणारी पिके; युसूफवडगांवचा बळीराजा आता फक्त दमदार पावसाची वाट पाहत आहे.

# अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर २४ तासांत दोन गुन्हे दाखल

गेवराई । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी अवैध धंद्यांविरुद्ध दिलेल्या कडक आदेशानुसार, गेवराई पोलिसांनी अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीवर धडक मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत गेवराई पोलिसांनी अवघ्या २४ तासांच्या आत दोन मोठ्या कारवाया करत एकूण २७ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गेवराई पोलीस पथकाने १३ जुलै रोजी शहरात पेट्रोलींग करत असताना



पहिली कारवाई: पहाटे ३:१० च्या सुमारास दत्तराज पार्क, गेवराई बायपास रोडवर 'भारत बेंझ' कंपनीचा हायवा (क्र. १२४४९७) संशयास्पद स्थितीत आढळला. तपासणीत त्यात अवैध वाळू वाहतूक केली जात असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी २० लाख ३० हजार रुपये किमतीचा हायवा आणि वाळू असा मुद्देमाल जप्त केला असून, या गुन्ह्याचा तपास पोह/२०२६ सुंदर राठोड करत आहेत. दुसरी कारवाई: त्याच दिवशी रात्री १०:५० च्या सुमारास साठेनगर कडून मोंढा नाक्याकडे जाणाऱ्या मार्गावर, विना नंबरचा 'अशोक लिलँड' बडा दोस्त पिकअप पकडण्यात आला. यात चोरटी वाळू व गौण खनिजाची वाहतूक केली जात होती. पोलिसांनी ७ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, या गुन्ह्याचा पुढील तपास पोह/१५४८ प्रकाश गव्हाणे करत आहेत.

# उमरी फाटा येथे भव्य रास्ता रोको आंदोलन

## शेतकऱ्यांना हेक्टरी १७ हजार रुपये पीक विमा द्या -राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी

कर्जमाफीची लढाई शेतकऱ्यांना जिंकल्यानंतर अतिवृष्टीत घोषणा केल्याप्रमाणे शेतकऱ्यांना हेक्टरी १७ हजार रुपये द्या तसेच बीड जिल्ह्यात पावसाने दांडी मारल्यामुळे शेतकऱ्यांची पीकं करपून चाललीत चंद्रयान मंगळयान पाठवणाऱ्या सरकारने शेतकऱ्यांसाठी कृत्रिम पावसाचा प्रयोग करण्यात यावा शेतकऱ्यांना सरसकट घोषणा केल्याप्रमाणे कर्जमाफी द्यावी या मागणी करिता बीड जिल्ह्यात बीड पिंपळनेर रोडवर शेतकरी हक्क



मोर्चाच्या वतीने राजेंद्र आमटे यांच्या नेतृत्वाखाली भव्य रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

शेतकरी आज संकटात आहे. शेतकऱ्यांना दुबार पेरणी करण्याची वेळ आली आहे. आठ-दहा दिवसात पाऊस पडला नाही तर तिसऱ्यांदा पेरणी करण्याची वेळ येते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. चंद्रयान मंगळयान पाठवणाऱ्या सरकारने शेतकऱ्यांसाठी कृत्रिम पावसाचा प्रयोग करण्यात यावा. मागील वर्षी घोषणेप्रमाणे हेक्टरी सतरा हजार रुपये पिकवतो शेतकऱ्याला मदत करण्यात यावी तसेच घोषणेप्रमाणे कर्जमाफी योजनेत सरसकट कर्जमाफी करण्यात यावी, कर्जमाफी योजनेत दगा फटका केल्यास शेतकरी हक्क मोर्चा खपून घेणार ◀◀ पान ३ वर

# स्व.अजितदादा पवार जयंती व माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त कृषी उत्पन्न बाजार समितीचे विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन

परळी । प्रतिनिधी

स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त तसेच माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळी वैजनाथ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने १५ ते २२ जुलै या कालावधीत विविध सामाजिक व लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व उपक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे व त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान (नाना) मुंडे व संचालक मंडळाने केले आहे.

लोकनेते तथा दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करत आणि माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजसेवेचा संकल्प करत परळी वैजनाथ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने १५ ते २२ जुलै या कालावधीत विविध सामाजिक व लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. समाजोपयोगी कार्याला प्राधान्य देत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमांत कन्हैया



**१५ ते २२ जुलै दरम्यान सामाजिक व लोकोपयोगी कार्यक्रम**
**नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे -सभापती सूर्यभान मुंडे**

वारकरी शिक्षण संस्था येथे शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, गुरुदास सेवा आश्रम, गुरुदास नगर (घाटनांदूर) येथे जीवनावश्यक वस्तूंचे वितरण तसेच पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण अशा विविध कार्यक्रमांचा समावेश आहे.

समाजातील विविध घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.स्व. अजितदादा पवार यांनी सहकार, सामाजिक बांधिलकी आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी केलेले कार्य आजही प्रेरणादायी मानले जाते. जनसामान्यांशी जिव्हाळ्याचे नाते, संघटन कौशल्य आणि समाजहिताचा ध्यास यामुळे त्यांनी लोकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ समाजोपयोगी उपक्रम राबविणे हीच त्यांना खरी आदरांजली असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी राज्याच्या मंत्रिमंडळात कार्यरत असताना शेतकरी, विद्यार्थी, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेत अनेक विकासकामांना गती दिली. विशेषतः कृषी, शिक्षण, पायाभूत सुविधा ◀◀ पान ३ वर

# हॉटेल गोल्डन चॉईस मध्ये १५ जुलै पासून नॉनव्हेजची विशेष व्यवस्था

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील प्रसिद्ध व नावाजलेले हॉटेल गोल्डन चॉईस मध्ये १५ जुलै पासून नॉनव्हेज पदार्थांची जेवणात विशेष व्यवस्था करण्यात आली असल्याचे हॉटेल व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले असून या जेवणातील चिकन मटण अंडी बिर्याणी फ्राय अंडी रुचकर पदार्थ उपलब्ध असतील ग्राहकांना आपल्या आवडीनुसार नॉनव्हेज जेवण मनपसंत मिळणार आहे याचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती



अशी की बीड मधील अत्यंत अत्याधिक नाव असलेले व नावारूपास असलेले हॉटेल गोल्डन चॉईस मध्ये आत्तापर्यंत शाकाहारी जेवणाची व्यवस्था होती जेवताना अनेक ग्राहक नॉनव्हेज जेवणाची जेवणाचे पदार्थांची मागणी करत असत अगदी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26